
म.ग्रं.सं., संग्रह शाखा, ठाणे.
विषय :..... निबंध .....
दा.क्र. : ३२४७

स्त्री मुक्ती
स्त्री स्वातंत्र्य

डॉ. ग. शि. पाटणकर



REFBK-0025529

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

8 MAY 1988

15 JUN 1988

11 JAN 1989

25 JAN 1989

22 FEB 1989

15 MAR 1989

14 JUN 1989

(क्र. मा. पहा)
५०००–११–८६

संदर्भ निबंध
3248
२५५२९
७३८८

व्यवस्था हीच घराची शोभा
आतिथ्य हेच घराचे वैभव
समाधान हेच घरातले सुख
धार्मिकता हाच घराचा कळस
संतुष्ट स्त्रिया हीच घराची लक्ष्मी


* * * * * * * * * * * * * *

स्त्री मुक्ती – स्त्री स्वातंत्र्य

लेखक

कीर्तनकार, ह. भ. प., व्हे. डॉक्टर, सामाजिक कार्यकर्ते

डॉ. ग. शि. पाटणकर





REFBK-0025529

* * * * * * * * * * * * * *

किंमत १० रुपये

डॉ० ग० शि० पाटणकर यांच्या या
रौप्य (२५ व्या) पुस्तकाचे प्रकाशन
डॉ० लीला कळमकर-आपटे एम्. एस्.
नागपूर, यांच्या हस्ते
७।११।१९८७ रोजी घाटकोपर, मुंबई ५२ येथे झाले.



© डॉ. ग. शि. पाटणकर



पहिली आवृत्ती ७।११।१९८७



मुद्रक :
प्र. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४




प्रकाशक :
धनंजय बाळकृष्ण ढवळे
केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ सदन, पहिली भटवाडी,
गिरगाव, मुंबई ४



सुशील, प्रेमळ, धर्मनिष्ठ पत्नी
कै० सौ० सरस्वतीबाई पाटणकर यांना

सप्रेम समर्पण



लेखकाचे निवेदन

❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

'स्त्री मुक्ती, स्त्री स्वातंत्र्य' या पुस्तकाचे निवेदन लिहिताना मला अतिशय मानसिक आनंद होत आहे. स्त्री आणि पुरुष ही समाजाची दोन चाके आहेत. एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. असे असून सुद्धा स्त्रीच्या वाट्याला दुय्यम स्थान दिले गेले आहे. तिच्या जीवनाला विषमता प्राप्त झाली आहे. भारतातच नव्हे तर जगातील सर्व स्त्रियांच्या वाट्याला हेच विषम जीवन दिले जात आहे. पंचवीस वर्षांपूर्वी सुधारलेल्या देशांत स्त्रियांच्या नव्या नव्या चळवळी सुरू झाल्या. उत्पादन व्यवस्था, समाजव्यवस्था बदलून गेल्या; परंतु पुरुषी अहंकार व पुरुषी वर्चस्व होते तसेच राहिले.

आपल्याकडे एक म्हण आहे. 'घर बाईचे व दार पुरुषांचे'. आजची स्त्री कितीही शिकलेली असली तरी परिस्थिती आहे तशीच आहे. बदल नाही. रशिया-अमेरिके-सारख्या जगातील सुधारलेल्या देशांत सुद्धा स्त्रीच्या वाट्याला चूल आणि मूल हेच जीवन आहे. स्त्रीला शिक्षण मिळाले. मतदानाचा हक्क मिळाला. नोकरीत समानसंधी मिळू लागली. तरी आजच्या या सुशिक्षित स्त्रीलासुद्धा मानाचे-माणुसकीचे स्वतंत्र जीवन जगता येत नाही. 'मी तुझा नवरा आहे' हे वाक्य घरोघरी बायकांना सारखे ऐकावे लागते. मुलींना लहानपणापासून पडखाऊ, दुबळ्या-निःसत्त्व 'तू मुलगी आहेस' अशा संस्कारात वाढावे लागते. अशा स्त्रियांना पुरुषी वर्चस्वाखाली सबंध आयुष्य कंठावे लागते.

महाराष्ट्रात स्त्री-मुक्ती चळवळ सुरू होऊन बरीच वर्षे झाली आहेत; परंतु ज्या मोठ्या प्रमाणात तिला वेग यावयास पाहिजे तेवढा आलेला मला तरी निदान दिसत नाही. याचे कारण स्त्रियांच्या कितीतरी समस्या आहेत तशाच असल्याचे दिसते. कुटुंबात सासरच्या मंडळींचा व नवरेशाहीचा छळवाद सहन करावा लागतो. नवऱ्याकडून मारहाण होणाऱ्या-बलात्काराला बळी पडणाऱ्या, हुंड्यापायी जाळल्या जाणाऱ्या-नवऱ्यांच्या व्यसनापायी जीवाला कंटाळून घर सोडून जाणाऱ्या, क्वचित प्रसंगी आत्महत्या करणाऱ्या कितीतरी स्त्रियांच्या बातम्या आपण रोज वाचतो. सासू-सून संबध, नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे प्रश्न, तिला घराबाहेर ऑफिसमध्ये मिळणारे कटू अनुभव, मुलगा हा वंशाचा दिवा. असे कितीतरी प्रश्न आहेत. ह्या सर्व समस्या एकदम सुटण्यासारख्या नाहीत. कितीतरी काळ लागेल, हे जरी खरे असले तरी स्त्री-मुक्ती सारख्या अनेक चळवळींनी संघटित होऊन जनजागृती करून पुरुषवर्गाच्या डोळ्यांत झणझणीत पण न झोंबणारे असे औषध घातले तरच स्त्री-जीवन सुधारण्याची शक्यता आहे असे मला वाटते. स्त्री-शक्ती म्हणजेच राष्ट्रशक्ती हे पुरुषांना पटवून दिले पाहिजे.

स्त्रियांच्या वरील बऱ्याच समस्या लेखकाने या पुस्तकात गोष्टीरूपाने आणि संवादात्मक पद्धतीने सोप्याभाषेत लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. तो कितपत साध्य झाला आहे हे सूज्ञ वाचकच ठरवितील. समाजसेवा या सदरात मी हे पुस्तक माझ्या वयाच्या ८३ व्या वर्षी लिहून प्रकाशित करीत आहे.

या माझ्या सामाजिक कार्यात स्त्री-मुक्ती चळवळीच्या कार्य करणाऱ्या मान्यवर व्यक्ती - श्रीमती छाया दातार, श्रीमती अरुंधती सरदेसाई आणि श्रीमती शारदा साठे (चिटणीस, स्त्री-मुक्ती संघटना, मुंबई) यांनी मला दिलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा अत्यंत-अत्यंत ऋणी आहे.

जगाच्या दृष्टीने हे पुस्तक जरी माझी कृती दिसत असली तरी यात माझे स्वतःचे असे फारसे काही नसून एका दृष्टीने मी माळ्याचे काम केले आहे. स्त्री-मुक्ती, स्त्री-स्वातंत्र्य, स्त्री-पुरुष समस्या या विषयांच्या ज्ञानरूपी बगीचातून निरनिराळ्या वृक्षवल्लीवरून मधुकर वृत्तीने सुंदर सुंदर फुले तोडून मी त्यांचा पुस्तकरूपी हार करून स्त्री-मुक्ती या चळवळीला यश चिंतणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या सेवेला सादर केले आहे.

सरतेशेवटी स्त्री-मुक्ती चळवळीला लवकरात लवकर यश येऊन आमच्या माता भगिनींचे विषमतेचे आयुष्य संपून त्यांचे जीवन पुरुषांप्रमाणे सुखी होवो अशी श्रीपरमेश्वराजवळ प्रार्थना करून निवेदन संपवितो.

१०१, ब्राह्मणवाडी,
माटुंगा, मुंबई ४०० ०१९
टेलिफोन नंबर ४७६९०१

आपला नम्र,
ग. शि. पाटणकर

अनुक्रमणिका

१	पाहिजे होता नातू झाली नात!	९
२	पांडुरंगा पुढील जन्म पुरुषाचा दे	१२
३	बायकांनी आपल्या पायरीनेच वागले पाहिजे	१४
४	हुंड्याशिवाय लग्न करण्याचे ध्येय	१७
५	तू मुलगी आहेस	१९
६	देवाने मला पुढील जन्म मुलीचाच द्यावा	२२
७	आजची स्त्री सुखी कशी होईल ?	२३
८	तर्क करणेसुद्धा अवघड आहे	२५
९	बायकांना काय कळवायचय् ?	२८
१०	ध्येयवादी स्वाभिमानी मधुवंती	३०
११	सुधा सुधाकर यांचा सुखी संसार	३४
१२	आम्ही बायकाही काही वेळा चुकतो	३६
१३	आदर्श नवरा कसा असावा	३८
१४	स्त्रीला आधी स्वातंत्र्य मिळाले पाहिजे	४१
१५	लग्नातील हुंडा व मानपान	४३
१६	स्त्री स्वातंत्र्य हीच खरी स्त्री मुक्ती	४५
१७	स्त्री मुक्ती-प्राध्यापकांचे भाषण	४६
१८	पक्षपाती सासुबाई	४९
१९	आम्हा बायकांना कमी लेखू नका	५२
२०	नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या समस्या	५३
२१	ताई माईच्या गप्पा	५६
२२	समारोप	५९



१. पाहिजे होता नातू–झाली नात !

❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

आजकालच्या जगात स्त्री सुशिक्षीत झाली आहे. स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावून काम करीत आहेत. असे असून सुद्धा आमच्या समाजातल्या बायकांना मुलगा हेच अपत्य हवे असते. सुनेला मुलगी झाली की, सासुबाईंचे चित्त भानावर राहात नाही हे दर्शविणारी ही गोष्ट आहे.

नानासाहेब शिदोरे हे एक सेवानिवृत्त सरकारी अधिकारी होते. पत्नी इंदिराबाई, मुलगी वसुधा व मुलगा रमेश असे सुखी कुटुंब होते. मुलगी पदवीधर होती व एका मोठ्या कंपनीत चांगल्या पगारावर नोकरी करीत होती. मुलाला एका कॉलेजात प्राध्यापकाची नोकरी होती. त्याची बायको एका मोठ्या कुटुंबातील होती, म्हणून ती नोकरी करीत नव्हती, करण्याची जरूरी नव्हती. वसुधा आता तेवीस वर्षांची झाली व तिच्या करता वरसंशोधन सुरू झाले. मंगळाची व बिनमंगळाची अशा दोन पत्रिका तयार केल्या गेल्या. मुलाला मंगळ आहे किंवा नाही याची बारकाईने वधूवर सूचक मंडळाकडे चौकशी करून नंतरच मुलीची पत्रिका पाठविली जात असे, त्यामुळे प्रत्येक ठिकाणी पत्रिका पटत असे. आजकालची परिस्थिती अशी आहे की, वरपिते मुलीची पत्रिका मागवून घेतात. बघत नाहीत. फक्त मुलीच्या आर्थिक परिस्थितीची माहिती आपल्या माणसांच्या मार्फत गोळा करतात व ती माहिती चांगली मिळाली, हुंडा-सोने-मानपान मिळण्या-सारखे आहे असे कळल्यावर वधूपित्याला पत्रिका पटल्याचे कळवितात. वसुधाच्या बाबतीतही असेच झाले. वसुधाची पत्रिका बाबूराव दामले यांच्या मुलाकडे पाठविली होती. बाबूराव दामले हेही एक सेवानिवृत्त सरकारी अधिकारी होते. अतिशय सालस–समाजसेवक व जगमित्र होते. पत्नी मालतीबाई जरा अहंकारी व गर्विष्ठ होत्या. दोन सुस्थळी पडलेल्या मुली व मुलींच्या पाठीवर असलेला सुधाकर नावाचा इंजिनिअर, लाडावलेला मुलगा आईवेडा म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. दामले यांनी पत्रिका पटल्याचे कळविले. मुलगी दाखविण्याचा कार्यक्रम झाला. मुलगी पसंत–मुलगा पसंत. लग्नाच्या याद्या झाल्या. दहा तोळे सोने, पाच हजार रुपये वरदक्षिणा, मानपान, दोन्ही अंगचा लग्नखर्च वगैरे ठरले. 'आम्ही काही

हुंडा वगैरे घेणार नाही.' इति मालतीबाई. चहापाणी झाले. साखरपुड्याचा मुहूर्त ठरला. हल्ली साखरपुडा हे एक वेडच आहे. या साखरपुड्याला इतका खर्च येतो की, पूर्वीच्या काळी एवढा खर्च लग्नाला सुद्धा होत नसे. वधुपित्याकडून पैसे उकळण्याचा आणखी एक पद्धतशीर मार्ग. लग्न मुहूर्त ठरला. सुधाकर व वसुधा यांचा मंगल विवाह झाला. आनंदी आनंद झाला. वसुधा सासरी गेली. सुधाकर आईवेडा आहे हे वसुधासारख्या चाणक्ष मुलीला कळायला वेळ लागला नाही.

दिवसामागून दिवस आनंदात जात होते. तोच चार महिन्यांनी आणखी एक आनंदाची घटना घडली. वसुधाला दिवस गेले होते. मालतीबाईंचा आनंद गगनात मावेना. बातमी सगळीकडे गेली. सुनेचे सूतिकागृहात नाव घातले गेले. नातू होणार, नातू होणार या आनंदात मालतीबाईंनी सुनेचे डोहाळजेवण मोठ्या थाटाने केले. दिवसामागून दिवस जात होते. वसुधेने आपल्या आईला ही माहिती आधीच दिली होती. योग्य वेळी वसुधा सूतिकागृहात गेली. मालतीबाई, त्यांच्या दोन्ही मुली आणि सुधाकर सूतिकागृहातून येणाऱ्या फोनची वाट पाहात होते. घंटा घणघणली, फोन आला. वसुधाला योग्य वजनाची गोड मुलगी झाली. मालतीबाईंनी फोन ताडदिशी टाकून दिला.

सासरची सगळी मंडळी दवाखान्यात मुलीला भेटावयास येतील अशी वसुधा आशा धरून होती. दुपारचे चार वाजले. इतर बाळंतिणींच्या घरची मंडळी येऊ लागली. वसुधाच्या माहेरची मंडळी आली, पण सासरचे कोणीही आले नाही. काय झाले असेल ? अशी वसुधाला काळजी वाटू लागली. वसुधाच्या आईने वसुधाला फार वेळ संशयात न ठेवता सांगून टाकले की, तुझ्या सासुबाईंचा फोन आला होता, 'आम्ही नातवाची आशा केली होती. आमची निराशा झाली तरी आमच्याकडचे कोणीही दवाखान्यात येणार नाही.' वसुधाला वाईट वाटले. निदान सुधाकर तरी येईल अशी आशा ती बाळगून होती, पण तो पडला आईवेडा. भेटण्याची वेळ संपत आली. तेवढ्यात वसुधाचे सासरे तिला व नातीला भेटावयास आले. त्यांनी वसुधाचे सांत्वन केले व 'मी चोरून आलो आहे. रोज येत जाईन. कोणाला सांगू नकोस.' असे सांगून गेले. वसुधाला फार बरे वाटले. दहा दिवस झाले. वसुधा आईकडे गेली. बारसे करावयाचे ठरले. इंदिराबाई दामलेमंडळींना बोलावणे करण्यास गेल्या. मालतीबाईंनी चक्क सांगितले की, मुलीच्या बारशाला आम्ही कोणी येणार नाही. तुम्ही उरकून घ्या. अपमान गिळून इंदिराबाई परत गेल्या.

बारसे खूप थाटामाटात झाले. मुलीचे नाव सुमती ठेवले. तीन महिन्यांनी वसुधा सासरी गेली. तिची रजा संपली होती. तिने सासुबाईंना मुलगी सांभाळण्याविषयी विचारले. सासुबाई म्हणाल्या, 'मी तुझ्या मुलीला सांभाळणार नाही. मुलगा असता तर सांभाळला असता. तू आपल्या आईकडे मुलीला ठेव व ऑफिसला जा.' वसुधाने तो मार्ग पत्करला, पण ऑफिस एकीकडे, माहेर दुसरीकडे तर सासर तिसरीकडे, त्यामुळे वसुधावर ताण पडला. तिची प्रकृती क्षीण झाली. काय करावे? विचार पडला. वसुधाचे बाबा म्हणाले, 'वसुधा, आमच्या शेजारचा ब्लॉक मी तुझ्या करता घेऊन ठेवला आहे. त्या ठिकाणी तू आणि सुधाकर येऊन राहा. आम्ही तुझी सुमती सांभाळू.' वसुधा एकदम खूष झाली.

घरी गेल्यावर तिने सुधाकरला व सासूबाईंना ही गोष्ट सांगितली. सुधाकर आईला सोडून तिकडे जाण्यास तयार नव्हता. मग वसुधाने सुधाकरला सांगितले की, 'तुम्ही रजा घ्या व सुमतीला सांभाळा.' त्यावर सुधाकर म्हणाला, 'मी तुझा नवरा आहे, तुझी मुलगी सांभाळणारा गडी नाही. तुला काय वाटेल ते कर.' वसुधा बाणेदार व स्वाभिमानी मुलगी होती. तिने स्वतःचे कपडे बांधले व टॅक्सी करून माहेरी आली.

तिने सुधाकरला आठ दिवसांनी पत्र लिहिले, 'मी तुम्हाला एवढेच कळविते की, 'आई ती आई आणि कांता ती कांता. आई न सुखवी जैसी कांता. इतकेच सांगून ठेवते. मी आठ दिवस तुमची वाट पाहीन. हे स्त्री मुक्तीचे युग आहे हे लक्षात ठेवा.'

वसुधाच्या वडिलांनी सुधाकरला एक दिवस बोलावून घेतले. त्याला स्त्रीचे महत्त्व पटवून दिले, 'अहो, तुमची आई ही स्त्रीच आहे. बायको ही स्त्रीच आहे तर मुलगी झाली म्हणून काय बिघडले? पुढे चार वर्षांनी दुसरा मुलगा होईल की. माझा तुम्हाला आशीर्वाद आहे. सुधाकरराव, आपल्या मुलीला सांभाळणे हे काय गड्याचे काम आहे? अहो, ते तुम्हा दोघांचेच काम आहे. आपल्या मुलांचा योग्य सांभाळ करणे, त्यांचे उत्तम शिक्षण करणे, त्यांना पुढील पिढीचे आदर्श बनविणे हे आई-वडिलांचेच काम आहे. तुम्ही दोघेही शिकलेले आहात. विचार करा.' असे बरेच समजावल्यावर सुधाकरला पटले. त्याने आपल्या आईची समजूत घातली.

वसधाला आणि छोट्या सुमतीला सुधाकरने थाटामाटात घरी आणले.

अहंकारी पुरुषी वृत्तीला धडा शिकविलाच पाहिजे, पण रबर फार ताणून उपयोगी नाही, कारण वेलीला वृक्षाच्या आधाराची जरूरी असते.

वाचकहो, आज स्त्री सुशिक्षित झाली आहे. पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात त्यांच्या बरोबर खांद्याला खांदा लावून काम करीत आहे. मुली मुलांच्या बरोबरीने किंवा अधिकच मार्क मिळवीत आहेत. तरी समाजाने मुलगा व मुलगी हा भेद मनात न आणता मुली झाल्या म्हणून नाराज न होता त्यांना मुलांच्या सारखी समान संधी द्यावी. त्या आपले कर्तृत्व नक्की दाखवतील. आता मुलगा म्हणजे म्हातारपणाची काठी. आता ती काठी राहिली नसून तो सोटा झाल्याचे दिसते. दिवसे दिवस वृद्धाश्रमांची वाढती संख्या हेच दाखविते. हल्ली मुलीच आईबापांना जास्त आधार देताना दिसतात. मुलीच जास्त मायाळू असतात.

❀ ❀

२. पांडुरंगा–पुढील जन्म पुरुषाचाच दे !

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

वाई या पवित्र क्षेत्रात गोरे कुळात एका शिल्पा नामक मुलीचा जन्म झाला. शिल्पा हळूहळू वयाने वाढू लागली. स्त्रीत्वाची पहिली चाहूल लागली आणि घरात आईकडून एक एक बंधने सुरू झाली. तिचे हंसणे, खेळणे, बाहेर जाणे वगैरे गोष्टी बंद झाल्या. 'तू मुलगी आहेस' हे वाक्य सारखे ऐकू येऊ लागले. आपल्यावर ही बंधने का घातली गेली आहेत, याचा तिला अर्थ कळेना. त्याचवेळी जर तिला धोक्याची कल्पना दिली असती, स्वतःचे रक्षण करण्याचे शिकविले असते तर किती बरे झाले असते. पण तशी रीत नव्हती. मुलीला कोमलांगी, अबला वगैरे विशेषणे द्यायची, घरात ठेवायची व उंबरठ्याशी पुरुषांनीच स्त्रियांचे रक्षण करायचे ही मोठी लक्ष्मण रेषा ठेवावयाची.

शिल्पा अतिशय हुशार मुलगी होती. त्यामुळे तिच्या वडिलांचे तिच्यावर फार प्रेम होते. त्यांनी तिला इंजिनिअर करायचे ठरविले व शिल्पाच्या वडिलांची इच्छा पूर्ण झाली. शिक्षण घेताना शिल्पाला ती मुलगी म्हणून फार अडथळे आले. मुले

जशी एकमेकांत संवाद करतात, पुस्तकांची देवाणघेवाण करतात तसे शिल्पाला काहीच करता येत नव्हते. कारण त्यावेळेस त्या कोर्सला मुली फारच थोड्या असत.

शिल्पा इंजिनिअर झाल्यावर गोरे घरात तिच्या लग्नाविषयी गोष्टी सुरू झाल्या. इंजिनिअर जावई मिळावा ही आई-वडिलांची इच्छा. पण शिल्पाची महत्त्वाकांक्षा फार जबदस्त होती. "स्त्रिया देखील कोणत्याही क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावून काम करू शकतात" हे तिला स्वतःच्या उदाहरणाने सिद्ध करावयाचे होते. तिने नोकरी मिळविण्याचा प्रयत्न सुरू केला, पण अनुभव मात्र फार वेगळा येऊ लागला. जिकडे तिकडे तिची स्त्री-इंजिनिअर म्हणून हेटाळणीच होऊ लागली. पुरुषप्रधान समाजाला म्हणजे स्त्रियांना दुय्यम स्थान देणाऱ्या पुरुषवर्गाला शिल्पा म्हणजे एक या खात्यात लुडबुड करणारी वेडी बाई असेच वाटू लागले. स्त्रीला दुय्यम स्थान देणाऱ्या समाजाला स्त्रीला आपल्या बरोबरीने वागविण्यास जड जाते हे शिल्पाच्या ध्यानात आले. तिने नोकरीचा नाद सोडून दिला. ती आईबापांना भेटण्याकरता व कृष्णाबाई नदीचा उत्सव पाहाण्यास आपल्या जन्मस्थानी म्हणजे वाईस गेली.

वाईस गेल्यावर शिल्पाच्या आईने तिला एका बाजूस नेऊन तिच्याशी बोलण्यास सुरुवात केली. 'हे पाहा शिल्पा, स्त्रीला कोणत्याही परिस्थितीत लग्न करणेच फायद्याचे असते. कुमारी स्त्रीला लोकांच्या टीकेला तोंड द्यावे लागते. काहीवेळा अतिप्रसंगही ओढवले जातात. स्त्रीची सगळी प्रतिष्ठाच ती विवाहित आहे का अविवाहित आहे यावर अवलंबून असते. मुलीच्या लग्नाचा उच्चबिंदू म्हणजे तिला नवरा कसा मिळाला आहे. तरी तू लग्न करावेस असे माझे मत आहे. आनंदाची गोष्ट म्हणजे शंकरराव रानडे यांचा गंगाधर नावाचा इंजिनिअर मुलगा रजा घेऊन येथे आला आहे. त्यांच्या घरातील सर्व मंडळींना तू पसंत आहेस. तरी तुझा निर्णय कळव. चार दिवसात लग्न होईल.' शिल्पा लग्नाला तयार झाली. रीतसर मुलगी पाहाण्याचा कार्यक्रम झाला व गंगाधर व शिल्पा यांचा विवाह अगदी साध्या रीतीने हुंडा-मानपान वगैरे काहीएक न घेता झाला.

नव्या नवलाईचे वैवाहिक जीवन सुरू झाले. शिल्पाच्या सांगण्यावरून गंगाधरने शिल्पाला एक ओळखीच्या ऑफिसमध्ये असिस्टंट इंजिनिअर म्हणून नोकरी लावून दिली. महिना दोन महिने बरे गेले, पण पुढे नोकरीवाल्या इतर बायकांचे अनुभव तिला येऊ लागले. पुरुषलोक स्त्रियांना लायकी असून सुद्धा जबाबदारीच्या निर्णय

घेण्याच्या जागा देत नाहीत. घरची आणि बाहेरची जबाबदारी सांभाळताना शिल्पाची ओढाताण होऊ लागली. 'स्त्री शिकलेली असो, अशिक्षित असो, सुंदर असो, कुरूप असो-कशीही असो.' केव्हा-कशी कुठे संधी मिळतेय, अशी पुरुषी प्रवृत्ती ऑफिसात दिसून आली.

घरी गंगाधरचा पुरुषी अहंकार सुरू झाला. काही तरी कारणाने भांडण झाले. गंगाधर म्हणाला, 'मी तुझा नवरा आहे हे लक्षात ठेव. पायातली वहाण पायातच राहिली पाहिजे. असा आमच्या वडिलांचा आदेश आहे.' ऑफिसात पुरुषी दडपशाही व घरी अहंकारी पुरुषीवृत्तीला कंटाळून तिने आत्महत्या केली. चिठ्ठी लिहून ठेवली होती.–'हे पंढरीच्या पांडुरंगा, मला पुढील जन्म पुरुषाचाच दे !'–

माझ्या पुरुष वाचकहो, आजच्या ह्या स्त्री-पुरुष समानतेच्या युगात स्त्रीला नोकरीत कमी समजू नका. दुय्यम स्थान देऊ नका. तिला जबाबदारीच्या, निर्णय घेण्याच्या जागावरून वंचित करू नका. 'जात्यावर बसले म्हणजे ओवी आठवते.' या नात्याने तिच्यावर जबाबदारी टाका. तुम्हाला दिसून येईल की, स्त्री जबाबदारीची कामे जास्त चांगल्या रीतीने करू शकते. तरी ऑफीसमध्ये काम करणाऱ्या स्त्रियांबरोबर वरील गोष्ट लक्षात ठेवून समतेची वागणूक ठेवा. तेही स्त्रीमुक्ती चळवळीचे एक उद्दिष्ट आहे.

३. बायकांनी आपल्या पायरीनेच वागले पाहिजे

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

❊ विमल गोंधळेकर, ही एका पांढरपेशा कुटुंबात
❊ जन्माला आलेली मुलगी होती. गोविंदराव म्हणजे विमलचे वडील हे एका प्राथमिक शाळेत शिक्षकाची नोकरी करीत होते. विमलचे शाळाशिक्षण सुरू झाले. विमलला लहानपणापासून "आपणही शिक्षिकेची नोकरी करावी" असे वाटत असे. गोविंदराव हे जुन्या वळणाचे-जुन्या पठडीतले, पुरुषप्रधान सत्तेचा पुरुषी अहंकार अंगी असलेले असे होते. विमलने तिच्या आईच्या कामात मदत केलेली त्यांना कधीच आवडत नसे. आईच्या दुर्बलतेवर, अकार्यक्षमतेवर गोविंदराव नेहमी कोरडे ओढीत असत व तिला या ना त्या कारणावरून नावे ठेवीत असत. विमलला या गोष्टीचे फार वाईट वाटत असे,

पण करणार काय ? कधी तिने आईची बाजू घेण्याचा प्रयत्न केला तर तिलाच वडिलांची बोलणी खावी लागत.

विमल उपवर झाली. उपवर मुलगी म्हणजे बापाला चिंता. त्याच्या डोळ्यापुढे उभा राहातो दहा बाय बाराचा आकडा. म्हणजे दहा तोळे सोने व बारा हजार हुंडा. वाढती महागाई, वाढता खर्च व विमलच्या लग्नाची काळजी. या सर्व गोष्टींमुळे आई-वडिलांचा संघर्ष वाढत गेला. विमललाही या गोष्टींची जाणीव होती; पण तिचे लग्न बापाच्या गरीब परिस्थितीमुळे जमत नव्हते. तिच्याच शाळेत काम करणाऱ्या मोडक नावाच्या शिक्षकाबरोबर ती जरा मोकळेपणाने वागू लागली. विमल दिसायला फार सुंदर होती. विमलचा वाढता सहवास मोडक मास्तरांना आवडू लागला. दोघांनाही एकमेकांविषयी प्रेम वाटू लागले व पती-पत्नी नाते व्हावे असे दोघांनाही वाटू लागले.—आणि एक दिवस मोडक मास्तरांनी विमलाबाई एकट्या आहेत असे पाहून विचारले, 'विमलाबाई, तुम्ही माझ्याशी लग्न करायला तयार आहात का ?' असे म्हणून मास्तरांनी विमलच्या गालावर एक हळूच चापट मारली. विमल लाजली व हसून म्हणाली, 'इश्य, कुणी पाहील ना ?' मोडक मास्तर काय तो अर्थ समजले. कारण विमलची ती मूक संमतीच होती.

विमलच्या आईने मोडक मास्तरांच्या घरी दोघांच्या लग्नाची गोष्ट सांगितली. मोडक मास्तरांच्या आईने विमलच्या आईला सांगितले, 'रमाबाई (विमलची आई) माझा मुलगा माधव सर्व दृष्टीने चांगला आहे, पण थोडा अहंकारी आहे. आई वेडा आहे. त्याचा राग फार वेळ टिकत नाही; पण लग्नाच्या आधी आपलं सांगून ठेवलेलं बरं.' त्यावर रमाबाई म्हणाल्या, 'अहो सर्वच पुरुष तसे असतात. आमच्या घरी तेच आहे. आमच्या विमलला तसे काही वाटणार नाही. माझी विमल माधवरावांच्या मर्जीप्रमाणे वागेल. रीतसर बोलणी होऊन माधव–विमलचा विवाह अगदी साध्या पद्धतीने पार पडला. हुंडा मानपान सर्व वर्ज.

लग्नाला दोन अडीच महिने झाले. या दोन महिन्याच्या काळात विमलने एवढे ओळखले की, शाळेतले मोडक मास्तर व विमलचे यजमान माधवराव मोडक यात जमीन-अस्मानाचे अंतर आहे. 'आपली निवड चुकली' असे तिला वाटू लागले. पण करणार काय ? 'आलिया भोगासी असावे सादर', या न्यायाने ती वागू लागली. महिना श्रावणाचा होता. रमाबाईंनी लेकीला शुक्रवारी सवाष्ण म्हणून जेवायला बोलाविले. शाळेतून रजा घेऊन सासुबाईंची परवानगी घेऊन विमल आईकडे जेवावयास गेली.

आईने विचारले, 'काय विमल, कसं काय चाललं आहे.' विमल एवढेच म्हणाली, 'सासरे जावई सारखेच आहेत.' ती आणखी काही बोलणार इतक्यात विमलची एक कमल नावाची मैत्रीण तिला भेटायला आली. माय-लेकींचे बोलणे तिथेच थांबले.

रमाबाईंनी कमलला पुरणाची पोळी खावयास दिली व त्या काही कामाकरता बाहेर निघून गेल्या. विमलला कमलने कुशल विचारले. विमल म्हणाली, 'काय सांगू कमल, कुठेही जा—पळसाला पाने तीनच. माझा नवरा कसा आहे हे तुला पाहिजे असणार तर ऐक, एकच प्रसंग सांगते.

आम्ही दोघे एकाच शाळेत शिक्षक-शिक्षिकेचे काम करतो. लग्न झाल्यावरचा दुसरा शनिवार. शाळा सकाळची होती. सासुबाई फार चांगल्या आहेत; म्हणून त्यांना काम पडू नये म्हणून मी पोळ्या करून ठेवल्या. भाजी चिरून ठेवली. शाळेला आधीच उशीर झाला होता. तेवढ्यात यजमान उठले. चहा पिऊन झाला. मला अजून बरीच कामे होती. म्हणून मी त्यांना सांगितले की, आपली अंथरुणे तुम्ही आवरून ठेवा. घाईघाईने आम्ही दोघेही एकदम घराबाहेर पडलो. थोडे अंतर गेल्यावर मी त्यांना विचारले 'अंथरुणे आवरलीत ना?' ह्यांचे उत्तर ऐकून मी थक्कच झाले. ते म्हणाले, 'नाही आवरली, आई आवरील.' मी त्यांना म्हटले, 'अहो, सासुबाईंना आपली अंथरुणे आवरावयास सांगणे बरोबर नाही, ते योग्य दिसणार नाही.' माझ्या बोलण्यातून व उद्‌गारातून माझ्या मनातील निराशा व चीड दिसली होती. हे ऐकल्यावर ह्यांचा पारा एकदम चढला. पुरुषी अहंकार जागा झाला व ते आवाज चढवून म्हणाले, 'एवढे वाटत होते तर तुला आवरायला काय झालं होतं? मला अक्कल शिकवते आहे, नोकरी करून पैसे मिळवते आहेस म्हणून फार शहाणी झाली आहेस असे समजू नकोस. आमच्या घरात बायकांनी आपल्या पायरीनेच वागले पाहिजे.' सबंध रस्ताभर अबोला. दाटून आलेल्या अश्रूंना दाबत ठेवून निग्रहाने घरी आले.

इतक्यात बाहेर गेलेल्या रमाबाई घरी आल्या. कुंकू लावून कमल व विमल दोघीही घरी गेल्या. 'पुरुषी अहंकार' एवढेच पुटपुटत.

वाचकहो, नोकरीवाल्या आजच्या स्त्रीसमोर अनेक समस्या आहेत. पूर्वी 'घर बाईचं व दार पुरुषाचं' असे होते. आता घर आणि दार, दोन्ही बाईचेच झाले आहे. स्त्री-मुक्ती चळवळींना समस्या सोडविण्याबद्दल यश येवो.

४. हुंड्याशिवाय लग्न करण्याचे ध्येय

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

गणपतराव परांजपे नावाचे एक शिक्षक ग्रामीण भागात राहात असत. त्यांना चार मुली व तीन मुलगे असा परिवार होता. त्यांनी आपल्या थोरल्या मुलीस तिच्या काकांकडे पुण्यास शिक्षणासाठी ठेवले होते. शकुंतला फार हुशार मुलगी होती. ती यथावकाश पदवीधर झाली व पुण्यातच एका कॉलेजमध्ये प्राध्यापिकेची नोकरी करू लागली. परांजपे मंडळी पुण्यात आली व त्यांनी आपला संसार शकुंतलेच्या जीवावर पुण्यात थाटला.

शकुंतला आता तेवीस चोवीस वर्षांची झाली होती. तिच्या मनात लग्नाचे विचार येऊ लागले. पण स्त्रीसुलभ लाजरेपणाने तिने तो विषय आईवडिलांकडे कधी काढला नाही. असेच दिवस, महिने, वर्षे उलटली. गणपतराव शकुंतलेच्या लग्नाबद्दल काहीच हालचाल करीत नव्हते. शेवटी नाइलाजाने एकदा शकुंतलेनेच आपल्या विवाहाचा विषय सहज बोलता बोलता आईवडिलांकडे काढला. वडिलांनी जमदग्नीचा अवतार धारण केला व शकुंतलेस विचारले, तुझे लग्न झाले म्हणजे आम्ही काय मरायचे? घरात पैसे कोण आणणार व घर कोण चालवणार? येवढी-सुद्धा अक्कल तुला असू नये ना? शकुंतलेला फार वाईट वाटले. तिने विचार करून मनाशी एक निर्णय घेतला व तो लगेचच पुढील महिन्यापासून अंमलात आणला. आता ती अर्धा पगार घरखर्चासाठी घरात देऊ लागली व अर्धे पैसे बँकेत स्वतःच्या विवाहाकरिता ठेवू लागली. पुरेसे पैसे जमले की, लग्न करावयाचे असे तिने ठरविले. लग्नाचा विचार आला की, नवरा कसा मिळेल? तो चांगला असेल का? असे प्रश्न तिला सारखे सतावीत. कारण एकंदर आजुबाजूच्या तरुणांकडे पाहून व त्यांची व्यसने पाहून ती धास्तावत असे. विचार कर-करून तिने आपल्या नशिबावर हवाला ठेवण्याचे ठरविले.

मुलगी उपवर झाली की, समाजाचा ससेमिरा त्या मुलीच्या पाठीमागे सुरू होतो. शकुंतला कॉलेजमध्ये जावो, समारंभाला जावो किंवा मैत्रिणीच्या लग्नाला जावो तिच्यामागे एकच प्रश्न पाठ धुऊन लागलेला असे, 'काय शकुतला, लग्नाबिग्नाचा विचार आहे की नाही?' या गोष्टींचा तिच्या मनावर नकळत परिणाम होतच

असे. पण भारतीय संस्कृतीचा तिच्या मनावर एवढा खोल पगडा होता की, तिला घरात करमत नव्हते व बाहेर पळूनही जाता येत नव्हते. संरक्षणासाठी तिला घराची गरज होती व तिचे आई, वडील, भाऊ, बहिणींना तिच्या पैशाची गरज होती.

बरेच वेळेला माणसाच्या आयुष्यात निराशेचे वातावरण निर्माण होते व तो दैववादी बनतो. अशाच मनःस्थितीत शकुंतला होती. ती देवधर्म करू लागली, उपास-तापास करू लागली. देव आपल्यावर कधी तरी दया करील असे तिच्या मनाने घेतले व तो खरोखरच शकुंतलेच्या मदतीला धावून आला.

शकुंतलेचा मावसभाऊ, जयवंत करमरकर, कॉलेजच्या कामानिमित्त परांजपे मंडळींकडे पुण्यात आला. जयवंत मुंबईस एका प्रख्यात कॉलेजमध्ये प्राध्यापक होता. शकुंतला व जयवंत या दोघांचे शिक्षण एकाच कॉलेजमध्ये झाले होते त्याला शकुंतलेची सर्व हकीगत ज्ञात होती व तो कामानिमित्त व शकुंतलेविषयी विचार करूनच पुण्यात आला होता. एक दिवस शकुंतला एकटी आहे असे पाहून जयवंताने शकुंतलेस लग्नाची मागणी घातली. शकुंतलेस मनोमन आनंद झाला.

तिच्यापुढे दोन समस्या उभ्या राहिल्या, 'मायेचे पाश तोडून आईवडिलांना व भावंडांना उघड्यावर टाकून जायचे की, दुधाचा सुंदर पेला ओठाशी आला असताना तो दूर ढकलायचा? कर्तव्य की स्वार्थ?' विचार कर करून तिच्या मनाने कर्तव्याच्या बाजूने कौल दिला व तिने जयवंताला नकार कळवला.

जयवंत हा ध्येयवादी व समाजसेवक होता. शकुंतलेने दिलेल्या नकाराने मुळीच डगमगला नाही, कारण हे उत्तर त्याला अपेक्षितच होते. हुंड्याशिवाय लग्न करावयाचे व तेही शकुंतलेबरोबरच असा त्याचा ठाम निश्चय होता.

दुसरे दिवशी जयवंताने शकुंतलेस पुन्हा एकटीस गाठले. आज तो शकुंतलेच्या व स्वतःच्या विवाहाच्या प्रश्नाचा निकाल करण्याच्या ठाम निश्चयाने आला होता. तो तिला म्हणाला, 'शकुंतले, तू सुशिक्षित आहेस, तुला वेडी म्हणण्याचे धाडस मी करीत नाही, पण तू घेतलेला कालचा निर्णय मात्र पूर्णपणे मूर्खपणाचा आहे. आलेली संधी आणि गेलेली वेळ पुन्हा कधीही येत नाही. माझी तुला नम्र विनंती आहे की, तू ही संधी वाया घालवू नकोस. आजकालची लग्नाची परिस्थिती तू पाहातेच आहेसच. माझा हुंड्याशिवाय विवाह करण्याचा निश्चय आहे. माझ्या मनात तरुण, अविवाहित म्हणून जन्मभर राहाणे हे आजच्या समाजात फार अवघड आहे. समाजाची अविवाहित स्त्रीकडे बघण्याची दृष्टी फारच वाईट आहे.

आईवडिलांची व भावंडांची काळजी तू बिलकूल करू नकोस. देवाला काळजी. मावसभावाशी लग्न केलेस तर लोक काही दिवस नावे ठेवतील व मागाहून सर्व विसरतील. नकार दिलास तर तुला आलेली संधी वाया घालविल्याबद्दल पश्चात्ताप होईल. तरी एखाद्या शहाण्या मुलीसारखी वाग व माझ्याशी विवाह कर.'

शकुंतलेला जयवंताचे म्हणणे सर्वस्वी पटले व तिने विवाहास संमती दिली. जयवंताने हसत हसत शकुंतलेला जवळ ओढण्याचा प्रयत्न केला. शकुंतला म्हणाली, 'सर्व गोष्टी लग्नानंतर.'

शकुंतला-जयवंताचा वैदिक पद्धतीने विवाह झाला व दोघे मुंबईला गेली.

वाचकहो, जयवंतने शकुंतलेला केलेला उपदेश आजच्या जगात किती व्यवहार्य आहे हे वेगळे सांगण्याचे कारण नाही.

५. तू मुलगी आहेस

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

सुंदरराव मराठे हे एक प्रतिष्ठित घराण्यातील गृहस्थ. ते अतिशय हुशार कर्तृत्ववान मनमिळावू व लोकप्रिय असे होते. मुंबईतील एका मोठ्या कंपनीत त्या कंपनीचे संचालक म्हणून ते काम करीत होते. ते डबल ग्रॅज्युएट होते. त्यांचा विवाह सुरेखा नावाच्या एका सुंदर मुलीबरोबर झाला. जोडपे सुखी होते. त्यांच्या जीवनात दोन फुले एकदम उगवली. त्यांना जुळे झाले, एक मुलगा व एक मुलगी. मुलगा मोहक होता. त्याचे नाव ठेवले मोहन. मुलगी सुरेख होती. तिचे नाव ठेवले स्वरूप. मुले मोठी झाली. शाळा संपवून कॉलेजात जाऊ लागली.

स्वरूप हुशार होती. वर्तमानपत्रे व पुस्तके वाचण्याचा तिला नाद होता. हुंडाबळी, स्त्रियांवरील अत्याचार, स्त्री-मुक्ती यावरील लेख ती वाचीत होती. इतकेच काय पण तिने डॉ. मोहाडीकर, डॉ. विट्ठल प्रभू यांनी लिहिलेली पुस्तकेही वाचली होती. मुंबई आकाशवाणीवरून सादर केलेली 'मनुष्य जन्मा तुझी कहाणी' ही मालिका आईच्या नकळत ऐकली होती.

एक दिवस ती असाच विचार करीत बसली होती. ती मनाशीच म्हणाली, 'हल्लीच्या काळात समाजात मुलगा आणि मुलगी असा भेदभाव केला जात नाही

असे बोलले जाते, पण माझ्या मते हे साफ खोटे आहे. पुरुष जात मुलींना दुय्यम समजते व तिला पुरुषी अहंकाराखाली दडपून टाकते. मुलगा आणि मुलगी हा फरक घरोघरी आहे.' आपली तळमळ कुठेतरी सांगावी या हेतूने स्वरूप आपल्या तारा नावाच्या जिवलग मैत्रिणीकडे गेली. विषय कसा काढावा हे स्वरूपला कळेना पण दैव थोर. एक सुरेख घटना घडली. स्वरूपने विचारले, 'कुठे गेली होती ग तुझी आई' त्यावर तारा म्हणाली, 'अग आमची आई म्हणजे त्या स्त्री-मुक्ती कार्यकारी मंडळापैकी एक आहे. त्यांची आंदोलने, प्रकल्प, सभा, मोर्चे वगैरे एक ना दोन चालू असते.' स्वरूपला माधुरीबाईंची म्हणजे स्त्री-मुक्ती कार्यकर्त्या बाईंची गाठ पडली म्हणून खूप बरे वाटले. ती त्यांना म्हणाली, 'आजकाल प्रत्येक ठिकाणी मुलगी आणि मुलगा यांत फरक नाही असे म्हणतात, पण खरं तर हा फरक घरोघरी आहे व तो असाच राहाणार, हा फरक मी तुम्हाला आकडेवार सांगून पटवून देते.'

माधुरीबाई व तारा ऐकू लागल्या. स्वरूप बोलू लागली—

(१) मी आणि माझा भाऊ मोहन. आम्ही जुळी मुले आहोत. वय सारखे, अभ्यास सारखा. आम्ही दोघेही अभ्यास करीत होतो. इतक्यात आई ओरडली, 'अग स्वरूप, जरा भाजी चीर, कुकर लाव, मला जरा आज लवकर बाहेर जायचे आहे.' मी आईला सांगितले, 'मला अभ्यास फार आहे. तू मोहनला सांग. त्याचा अभ्यास झाला आहे.' त्यावर आई म्हणाली, 'तो मुलगा आहे त्याने कामं करायची नसतात. तू मुलगी आहेस तुलाच ही कामे केली पाहिजेत. फरक पहिला, तू मुलगी आहेस.

(२) मे महिन्यातील एका रविवारी माझ्या भावाने आपल्या काही मित्रमंडळींबरोबर पोहण्याला जाण्याचा कार्यक्रम आखला. मित्रमंडळी सर्व कपडे वगैरे घेऊन तयार झाली. मी आईला म्हटले, 'मी सुद्धा मैत्रिणींना घेऊन दादाबरोबर पोहायला जाते.' आई एकदम ओरडून म्हणाली, 'स्वरूप, तुला वेडबीड तर लागलं नाही ना ? अग तू कॉलेजमधली मुलगी ! मुलांच्या बरोबर पोहायला जातेस ! लाज कशी नाही वाटत तुला. काही जायचं नाही. अग तू मुलगी आहेस हे लक्षात ठेव.' फरक नंबर दोन, तू मुलगी आहेस.

(३) माझा भाऊ मोहन उत्तम क्रिकेट खेळतो. आंतरविद्यापीठ क्रिकेट स्पर्धेत त्याने आमच्या कॉलेजला बरेच वेळा विजय मिळवून दिला आहे. तो बरेच वेळा बाहेरगावी क्रिकेट खेळायला जातो. मी आमच्या कॉलेजच्या बास्केटबॉल टीमची

कसान आहे. मला बरेच वेळा बक्षिसेही मिळाली आहेत. माझी विद्यापीठाच्या टीममध्ये निवड झाल्यावर आईला खूप आनंद झाला, पण 'माझ्या मुलीला बाहेरगावी पाठविण्यास मी तयार नाही' असे तिने स्पष्टपणे सांगितले. त्यावर मी आईला म्हणाले, 'मग, मोहन कसा बाहेरगावी जातो?' त्यावर आई नेहमीच्या ठसक्यात म्हणाली, 'तूं मुलगी आहेस.'

(४) आमच्या कॉलेजचे गॅदरिंग जवळ आले. नाटक करायचे ठरले. कार्यकारी मंडळाने एकमताने स्वरूप मराठे हिची नायिका व वसंत जाधव याची नायक म्हणून निवड केली. घरी आल्यावर मी आईला आनंदाने ही बातमी सांगितली. यावर आई कडाडून म्हणाली, 'अग कारटे कुणाचा कोण तो जाधव! तूं त्याची होणार? मला मुळीच पसंत नाही. अग, माझा जगजाहीर अनुभव सांगते. अविवाहित मुलगा आणि अविवाहित मुलगी यांनी नाटकात पतिपत्नीचे काम केले तर ती कायमची पतिपत्नी होतात. त्यांच्या त्या तालमी-हसणी-खेळणी, त्यातून प्रेम व शेवटी पतिपत्नीचे कायमचे नाते. काय? आलं का ध्यानात, आत्ताच्या आत्ता जा आणि तुझ्या मित्रमंडळींना नकार देऊन ये. प्रकार चौथा. 'तू मुलगी आहेस.'

बरीच उदाहरणे देता येतील पण शितावरून भाताची परीक्षा. एवढीच विनंती करते की, ही माझी कहाणी ठेवा तुमच्या स्त्री-मुक्ती कार्यकारीमंडळापुढे. घ्या निर्णय काय घ्यायचा तो.

तात्पर्य—भगिनी वर्गाने आपल्या घरात मुलीला, 'तू मुलगी आहेस' असे सारखे सारखे म्हणणे सोडून द्यावे. त्यामुळे मुलींना असे वाटू लागते की, आपल्यात काहीतरी कमी आहे. आपण दुय्यम आहोत व त्यांच्यामध्ये एकप्रकारचा न्यूनगंड उत्पन्न होतो. उलटपक्षी मुलांच्यामध्ये पुरुषी अहंकाराचे बीजारोपण होते व तो अहंकार पुढे बायकांना त्रासदायक होतो. काय पटतय् का?

६. देवाने मला पुढील जन्म मुलीचाच द्यावा

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

❊ आज लतिका सकाळी सकाळीच आईशी
❊ भांडत होती. 'हे काय ग आई, तू मला आपली सारखी तू मुलगी आहेस, तू मुलगी आहेस असे का म्हणत असतेस? तू सुद्धा मुलगीच होतीस ना? आज मुलगी सर्व क्षेत्रांत मुलांच्याप्रमाणे आघाडीवर आहेत. कोणी डॉक्टर होतात, कोणी इंजिनिअर म्हणून काम करतात इतकेच काय पण शिक्षणासाठी परदेशातसुद्धा जातात. परदेशांत सर्व संकटांना तोंड देतात. क्रीडाक्षेत्रात वायकांचा क्रिकेटसंघ आहे. स्त्रियांनी ऑलिम्पिकमध्ये बक्षिसे मिळविली आहेत.' आई ऐकत होती व तिचे व्याख्यान थांबवून आई म्हणाली, 'ते काही जरी असले तरी समाजात स्त्रीला दुय्यम स्थान आहे. किती शिकली तरी तिच्या वाटेला चूल आणि मूलच ना? समाज मुलींच्याकडे अशाच दृष्टिकोनातून पाहातो. आज समाज कोणालाही मुलगी झाली की वाईट वाटते व मुलगा झाला की आनंद वाटतो अशा प्रवृत्तीचा आहे. मुलगा मोठा झाल्यावर आईवडिलांना आधार देतो, संरक्षण करतो.' आईचे हे बोलणे ऐकून लतिका रागाने म्हणाली, 'मुलगा आईवडिलांचे रक्षण करतो असे म्हणतेस तर वृद्धाश्रम चाललेच नसते. वृद्धाश्रमांची संख्या दिवसेदिवस वाढतच चालली आहे. म्हणूनच समाजाने मुलगा-मुलगी असा भेद न करता दोघांनाही समतेने वाढविले पाहिजे.'

मायलेकींचा वाद चालू होता. इतक्यात लतिकेची मैत्रीण लीला तिला भेटावयास आली. लतिकेच्या आईने लीलाला वादाचे स्वरूप सांगितले. लतिकेच्या आईला वाटले की, लीला आपल्या बाजूने बोलेल. आपली मते निदान लीलाला पटतील; पण लीलाने आईला सांगितले 'तुम्ही बायकाच आमचे पाय मागे ओढता. तुम्ही स्वतः स्त्री असून आम्हा मुलींना दुय्यम स्थान देता. भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी होत्या. इंग्लडमध्ये मार्गारेट नावाची स्त्री दुसऱ्यांदा इंग्लंडची पंतप्रधान म्हणून निवडून आली आहे.' लीला जरा थांबली. लतिका लीलाला म्हणाली, 'लीला, थांबू नकोस. आईचे कान मी टोचून उपयोगी नाही. तिला तुझ्यासारखा सोनारच हवा.' लीला आईला म्हणाली, 'माझे म्हणणे पटते आहे कां? समाजाला या दोन स्त्रिया काय दाखवितात? स्त्रिया पंतप्रधान पदासारख्या सर्वश्रेष्ठ जबाबदाऱ्या पुरुषांपेक्षाही

जास्त चांगल्या रीतीने सांभाळू शकतात. मोरारजी सरकार कोलमडल्यावर इंदिरा गांधींनी १९८० मध्ये पुन्हा एकदा पंतप्रधानपद मिळवून स्त्रीसामर्थ्याचा धक्का दिला.' लतिकेची आई म्हणाली, 'खरं आहे बाई, तुम्ही शिकलेल्या मुली, आम्ही काय बोलणार तुमच्यापुढे!' नंतर चहापणी कार्यक्रम झाला. जाता जाता लीला लतिकेच्या आईला म्हणाली, 'स्त्री आणि पुरुष ही समाजाची दोन चाके आहेत. दुसऱ्या अर्थाने एकाच पक्ष्याचे दोन पंख आहेत. यातला एक जरी पंख दुबळा झाला, दुखावला तरी तो पक्षी जरा सुद्धा उडू शकणार नाही. त्याच न्यायाने समाजरूपी पक्ष्याने दोन्ही पंखांना बलवान केले पाहिजे, शक्तिवान केले पाहिजे. मुलगा आणि मुलगी यांना समानतेने वागविले पाहिजे. आजच्या विज्ञानयुगात, जेटयुगात पुरुषाला जेवढे महत्त्व आहे तेवढेच महत्त्व मुलीला, स्त्रीला आहे. मुलगा-मुलगी असा भेद करणे मागासपणाचे आहे. मी तर पुढे जाऊन म्हणेन पुरुषी अहंकार घालविण्याकरिता समाजातील मुलाला दिलेले असामान्य महत्त्व घालविण्याकरिता व स्त्रियांना योग्य ते समानत्त्व मिळवून देण्याकरिता मला देवाने पुढील जन्म मुलीचाच द्यावा.'

७. आजची स्त्री सुखी कशी होईल?

❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

शालिनी शानभाग ह्या मुलीचा जन्म ग्रामीण भागात झाला होता, पण तिचे सर्व शिक्षण पुण्यात झाले होते. ती महाविद्यालयात काम करीत होती. एक दिवस अंथरुणावर पडता पडता ती आपल्या पुढील आयुष्यातील जोडीदाराचा विचार करीत होती, 'मी अडाणी नाही, रोगी नाही, कुरूप नाही, परावलंबी नाही. थोडक्यात म्हणजे ज्या कोणत्याही कारणाने स्त्रीजीवन विसकटून जाईल असे एकही व्यंग माझ्याकडे नाही.' तेवढ्यात तिला झोप लागली.

आईवडिलांना मुलगी उपवर झाली म्हणजे तिच्या लग्नाची चिंता वाटू लागते. त्याचप्रमाणे शानभाग घरातही शालिनीच्या लग्नाची चिंता वाटू लागली, घरात लग्नाची भाषा सुरू झाली. काही ठिकाणी तिच्या मनाविरुद्ध दाखविण्याचा कार्यक्रमही झाला.

शालिनी एक दिवस आईला म्हणाली, 'आई, माझ्या लग्नाची तुम्ही घाई करू नका. तुझी मुलगी सुशिक्षित, सुसंस्कृत, चांगल्या घराण्यातील, निरोगी व अर्थार्जन करणारी आहे. गावात, महाविद्यालयात, विद्यार्थी-विद्यार्थिनींत मला मानाचे व कौतुकाचे स्थान आहे. ठिकठिकाणी माझी व्याख्याने होतात, तेव्हा माझ्या गुणांचे कौतुक करणाऱ्या एका प्राध्यापकाशी मी लग्न करणार आहे. आमच्या आणा-भाका झाल्या आहेत. तेव्हा तुम्ही माझ्या लग्नाचा विचार मनातून काढून टाका. शालिनीच्या आईवडिलांनी लग्नाचा विचार सोडून दिला.

शालिनीचे लग्न ठरल्याप्रमाणे मधुकर कामत ह्या प्राध्यापकाबरोबर अगदी साध्या रीतीने झाले. हुंडा, मानपान, जेवणावळी वगैरे सर्व गोष्टी माफक प्रमाणात झाल्या.

बारा तेरा वर्षे सुखाचा संसार झाला. शालिनीने पतीला देव समजून तनमन-धनाने त्याची मनोमन पूजा केली. दृष्ट लागण्यासारखा, सोन्यासारखा, कुणीही हेवा करावा असा संसार एकाएकी उद्ध्वस्त झाला. कां? पुरुषी अहंकारी अरेरावी वृत्तीमुळे व दुर्व्यसनीवृत्तीमुळे.

ज्या प्राध्यापकाला साधे सुपारीचे देखील व्यसन नव्हते तो प्राध्यापक आज दारू, जुगार, सट्टा, बाई यांच्या आहारी गेला.

'तुला मूल होत नाही' असे सारखे सारखे म्हणून शालिनीची हेटाळणी करू लागला. शालिनी मनाशी म्हणू लागली, 'माझा पती घरात सर्व सुख असून अस्वस्थ झाला आहे. पत्नीची प्रतिष्ठा, तिचा नावलौकीक ह्या गोष्टी त्याला दुःखद वाटू लागल्या आहेत. माझे सौंदर्य त्याला आता पालापाचोळ्या सारखे वाटू लागले आहे. घरात दारू पिऊन आल्यावर मला अर्वाच्य शिव्या देतो, दारूच्या नशेत मला मारहाणसुद्धा सोसावी लागते.' विचाराच्या तंद्रीत असताना दारावरची घंटा वाजली. तिने दार उघडले. तिची मैत्रीण वसुंधरा पत्की आली होती. शालिनी तिला अस्वस्थ दिसली. मैत्रिणीने तिला अस्वस्थतेचे कारण विचारले. शालिनीने वसुंधरेला घडलेली सर्व हकीगत सांगितली. ती उद्ध्वस्त अवस्थेत बोलू लागली, 'काय सांगू वसुंधरा, असे वाटते की, ज्याच्या नावाने देवाब्राह्मणांसमक्ष गळ्यात मंगळसूत्र बांधले ते तोडून फेकून द्यावे. ज्याच्या नावाने कपाळावर कुंकुम तिलक लावला तो पुसून टाकावा. माझ्यासारख्या सुसंस्कृत, सुशिक्षित, सुस्वभावी, सुंदर व अर्थार्जन करणाऱ्या स्त्रीने हा अन्याय का म्हणून आणि किती दिवस सहन करावा? स्त्री मुक्ती चळवळ करणाऱ्या कार्यकर्त्या स्त्रियांकडे याला आहे का काही

उत्तर ? याला उत्तर काही नाही. मी बाई आहे हेच उत्तर.' वसुंधरेला शालिनीचे सर्व विचार पटले. ती शालिनीला म्हणाली, 'शालिनी सरकारने स्त्रियांविषयी केलेले कायदे कागदावरच आहेत. स्त्रियांच्या समस्या अजिबात कमी झालेल्या नाहीत. पुरुषप्रधान जीवन पद्धती आणि अहंकारी पुरुषी प्रवृत्ती स्त्रियांच्या दुःखाला कारणीभूत आहेत.

दारावरची घंटा वाजली. मधुकरने दारूच्या नशेत आणखी दोन मित्रांसह प्रवेश केला. शालिनी व वसुंधरा घराबाहेर पडल्या. जाता जाता शालिनी एवढेच म्हणाली, 'आजपासून तुम्ही मला मेलात व मी तुम्हाला मेले असे समजा.' शालिनी कोठे गेली कळावयास मार्ग नाही.

वाचकहो, स्त्रियांची भागीदारी जशी संसारात हवी तशीच राजकीय व सामाजिक क्षेत्रात हवी, हा विचार आता कोणी फार काळ बाजूला ठेवू शकणार नाही. स्त्री–पुरुष समानतेचा हा लढा प्रत्येक घरात, गावात, ग्रामपंचायतीत, जिल्हा परिषदेत, कायदेमंडळात, मंत्रीमंडळात स्त्रीमुक्ती चळवळीमार्फत व बहुजन समाजामार्फत संघटित होऊन मोठ्या प्रमाणावर लढविला जाईल त्याच वेळेस पुरुष–प्रवृत्ती बदलेल व स्त्री खऱ्या अर्थाने सुखी होईल.

८. तर्क करणे सुद्धा अवघड आहे

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

नाशिकचे नारायणराव नानसकर सरकारी नोकरीतून निवृत्त झाले. त्यांना कीर्तनाची, भजनाची व गाण्याची फार आवड होती. त्यांची पत्नी त्यांना साजेशी होती. मुलाचे नाव त्यांनी प्रमोद ठेवले व मुलीचे नाव मुग्धा ठेवले. प्रमोद मोठा झाला. डॉक्टर झाला. आईवडिलांनी त्याचे लग्न करावयाचे ठरविले. नवरा मुलगा डॉक्टर, म्हणजे हल्ली एक नवीन म्हण प्रचारास आली आहे. 'दहा बाय बारा' याचा अर्थ दहा तोळे सोने, बारा हजार हुंडा, मानपान, लग्नाचा खर्च वगैरे वगैरे. पण प्रमोद याविरुद्ध होता. त्याने आईवडिलांना सांगितले की, मुलगी सदाचारी, सुशील, उत्तम संस्काराची, पदवीधर व माझ्या रूपाला साजेशी असावी. वधुपित्यांचे येणे जाणे सुरू झाले. या स्थळाची बातमी इगतपुरीच्या सोनोपंत साने नावाच्या

शिक्षकापर्यंत जाऊन पोहोचली. त्यांनी आपल्या मुलीचा फोटो बरोबर घेतला. मुलीचे थोडेसे वर्णन एका कागदावर लिहून घेतले. 'मुलगी पदवीधर, उंच, गोरी, कष्टाची सवय असलेली, आल्यागेल्याचे आनंदाने, हसतमुखाने स्वागत करणारी, स्वभाव थोडासा रागीट पण सत्यासाठी, असेल त्या अन्नात मिळेल त्या वस्त्रात समाधान मानेल अशी होती. सोनोपंत साने इगतपुरीस साने गुरुजी म्हणून प्रसिद्ध होते. ते नाशिकला गेले. नारायणरावांना भेटले. मुलीचा फोटो दाखविला व तिचे वर्णन लिहिलेला कागद नारायणरावांच्या हातात दिला व म्हणाले, 'थोडी स्तुती होते आहे, पण सांगितल्याशिवाय कळणार नाही. एवढेच सांगतो, ही माहिती घेऊन आपण इगतपुरीस येऊन त्याच्या खरेखोटेबद्दल कोणाकडूनही खात्री करून घ्यावी.' नानसकर मंडळींनी फोटो पाहिला, माहिती ऐकली व मुलगी पाहाण्यास आणण्याचे सोनोपंतांना आमंत्रण दिले. सर्व कार्यक्रम झाले. साने गुरुजींची वंदना —सौ. वंदना नानसकर झाली.

डॉ. प्रमोदचा धंदा उत्तम चालू होता. आनंदाची गोष्ट म्हणजे तीन तीन वर्षांच्या अंतराने त्यांना दोन मुले झाली. मुलगा सुधीर व मुलगी सुधा. मुलगा ८ वर्षांचा झाला. मुलगी ५ वर्षांची झाली. मध्यंतरीच्या काळात मुलांचे आजी–आजोबा म्हातारपणाच्या आजाराने दिवंगत झाले. त्यानंतर डॉ. प्रमोदरावांच्या संसाराला फार मोठा धक्का बसला. सौ. वंदनाताईंना कर्क रोग झाला आणि त्या मुलांना व नवऱ्याला सोडून गेल्या.

डॉक्टरांनी दुःख बाजूला ठेवले व मुलांची व्यवस्था करण्याच्या दृष्टीने स्वयंपाकाला एक बाई ठेवली व पुनर्विवाह करण्याच्या दृष्टीने आपल्या मुंबईच्या एका मित्रास पत्र लिहिले. तो मित्र समाजकार्य करणारा होता. त्याने माटुंगा येथील एका संस्थेशी संपर्क साधून काम सुरू केले. त्या संस्थेने दोन विधवा लग्नास तयार असल्याचे कळविले. डॉक्टरांना तार करून बोलावण्यात आले. एक विधवा परिचारिका होती तिचा नवरा एक वर्षापूर्वी निधन पावला होता. दुसरी स्त्री सुशीला जोशी नावाची दहा वर्षे विधवावस्थेत होती. पण ती फार मोठ्या घराण्यातली होती. तिचे वडील सरकारी अधिकारी म्हणून निवृत्त झाले होते. दोन भाऊ सचिवालयात नोकरीला, बहिणी सुस्थळी होत्या. डॉक्टरांना व त्यांच्या मित्राला वधू पसंतीचा प्रश्न पडला. नाणे फेक करण्याचे ठरले. कौल सुशीलेच्या बाजूने पडला. वैदिक पद्धतीने लग्न झाले. डॉ. प्रमोद सुशीलेसह त्याच रात्री नाशिकला गेले.

पुन्हा नवा संसार सुरू झाला. सुशीला स्वभावाने फार चांगली होती. ती मुलांचे प्रेमाने करू लागली. तिला फक्त राग होता तो डॉक्टरांच्या पुरुषी अहंकाराचा. सर्वच बायकांना हा त्रास असतो असे मनाचे समाधान मानून ती राहू लागली. डॉक्टर मधून मधून वंदना अशी होती, स्वयंपाक चांगला करीत असे, असे म्हणत असत. सुशीला पहिल्या-पहिल्याने कानाडोळा करीत होती पण हे पुराण वाढतच राहिले. सुशीला त्यावर काही बोलू लागली की, डॉक्टर तिला वाटेल ते बोलत असत, तिचा अपमान करीत. लढा वाढतच गेला. डॉक्टरांनी आपल्या पहिल्या बायकोचे पूर्णाकृती तैलचित्र काढून आणून ते दिवाणखान्यात लावले. दुसऱ्या दिवशी सुशीलेने त्या चित्रकाराचा पत्ता काढून आपल्या पहिल्या नवऱ्याचे चित्र काढण्याचा आदेश दिला. घरात वादावादी थोडी कमी झाली होती. सुशीलेला आपल्या पहिल्या नवऱ्याचे चित्र, 'ड्रेसिंगरूम' मध्ये ठेवायचे होते. चित्रकाराने चित्र आणून दिले व पैसे घेऊन तो निघून गेला. सुशीलेने ते चित्र आपल्या खोलीत लावले. डॉक्टर एक वाजता दवाखाना बंद करून घरी आले. जेवणाच्या खोलीत जाताना त्यांची नजर त्या चित्रावर गेली. त्यांनी ते बघितले नसल्याचे सोंग केले. जेवण हसत हसत पार पडले. दुपारची झोप झाली. चहाचे वेळी डॉक्टरांनी सुशीलेला विचारले, 'हे चित्र लावण्यापूर्वी तू मला का विचारले नाहीस? ती म्हणाली, त्यात काय विचारायचं! तुम्ही पहिल्या बायकोचं चित्र काढून आणलं तेव्हा मला कुठे विचारलं होतं? डॉक्टर कडाडून म्हणाले, 'मी तुझा नवरा आहे. कोणत्याही परिस्थितीत संध्याकाळपर्यंत हा फोटो इथून निघालाच पाहिजे. जातो मी.'

वाचकहो, या स्त्री-मुक्ती चळवळीच्या व स्त्री-पुरुष समानतेच्या दिवसांत सुशीलाबाईंनी काय निर्णय घेतला असेल? तर्क करणे सुद्धा अवघड आहे.



९. बायकांना काय कळवायचयं ?

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

वाचकहो, गोष्ट लहान पण अर्थ महान; अशी ही गोष्ट आहे. कार्यालयातून काम करणाऱ्या प्रत्येक स्त्रीला ही गोष्ट आपल्यावरूनच लिहिली आहे काय असे वाटेल.

मुंबई महानगरपालिकेच्या बोरिबंदर रेल्वे स्टेशन समोरच्या कार्यालयातील एका विभागात केशवराव दाते, नारायणराव बोडस, माधवराव आपटे व गोविंदराव करमरकर अशी चार मित्रमंडळी काम करीत असत. त्यांचा एक ग्रुप होता. केशवराव दाते हे नावाप्रमाणे दानशूर होते. ते दरवर्षी त्यांच्या वाढदिवसाच्या दिवशी आपल्या तीन मित्रांना चित्रपट पाहाण्यास नेत असत. तेथेच त्यांचा चहापानाचा मोठा कार्यक्रम होत असे.

सालाबादप्रमाणे केशवरावांचा वाढदिवस आला. त्यांनी आपल्या तिन्ही मित्रांना कार्यालयात आल्याबरोबर आमंत्रण दिले. ह्या सर्व मित्रांच्या बायका मुंबईत निरनिराळ्या कार्यालयांत काम करीत होत्या. साडेतीन चार वाजण्याच्या सुमारास केशवरावांनी मित्रांना त्यांनी आपआपल्या बायकांना कार्यक्रमाची कल्पना दिली की नाही याबद्दल विचारले. आपल्या नवऱ्याला घरी यायला उशीर का झाला अशी त्या बायकांना काळजी करायला लागू नये हा केशवरावांचा उद्देश होता. त्यावर नारायणराव म्हणाले, 'बायकांना काय कळवायचयं ! पाहातील जरा वाट. अहो, आमच्या बायकोला जर फोनने कळविले तर ती मलाच दम देईल. काहीतरी कारण सांगून मला कार्यालय सुटल्याबरोबर घरी येण्यास सांगेल. मग मात्र मला चित्रपट बघण्यास येता येणार नाही. तेव्हा न कळविणे, हा मार्ग उत्तम, फोन करण्याचा खूप प्रयत्न केला, पण लागला नाही अशी लोणकढी थाप मारायची.' बाकीच्या दोन्ही मित्रांनी नारायणरावांना साथ दिली. कार्यालय सुटल्यावर सर्व मंडळी चित्रपट पाहावयास गेली.

नारायणरावांची पत्नी आपल्या कार्यालयातून घरी परतली. साधारणपणे सात वाजण्याचा सुमार होता. तिने चहा केला व नवरोबांच्या येण्याची वाट पाहात बसली. दहावीस मिनिटे गेली. रोजची घरी येण्याची वेळ टळून गेली. काळजी

वाटू लागली. तिने चहा पिऊन घेतला व नारायणरावांचा चहा झाकून ठेवला. हळूहळू स्वयंपाक करण्याचे काम सुरू केले. साडे नऊ वाजले. 'मन चिंती ते वैरी न चिंती' अशी एक म्हण आहे. पत्नी मनात म्हणत होती, 'काय बरं झालं असेल? मोटार–रेल्वेचा काही अपघात तर झाला नसेल ना? दहा वाजले. दारावरची घंटा वाजली. नारायणराव घरी आले. घरचे वातावरण गरम असणार हे त्यांनी आधीच ओळखले होते. आल्या आल्या पत्नीने नारायणरावांना विचारले, 'काय हो तुम्हाला एवढा उशीर होणार होता तर बायकोला फोनने कळविता येत नव्हतं का? इथे काळजी करता करता मी अगदी हैराण झाले. पुरुषी अहंकार! बायको काय जरा रागवेल, मग गप्प बसेल!' त्यावर नारायणराव म्हणाले, 'अग नाण्याची दुसरी बाजू तरी ऐक. मी तुला फोन करण्याचा प्रयत्न केला. फोन लागला नाही त्याला मी काय करू?' पत्नी म्हणाली, 'फोन लागला नाही ही तुमची नेहमीचीच थाप आहे.' त्यावर नारायणराव म्हणाले, 'बरं बाईसाहेब, आम्ही चुकलो, तुला कळवायला पाहिजे होते. तुमच्या रागाबद्दल आम्ही आज आमच्या झोपेत एक तास कपात करू. मग जाईल ना राग!' त्यावर पत्नी म्हणाली, 'काहीतरी चावट चेष्टा करून बायकांना हसवायचं आणि राग घालवायचा हा तुमच्या पुरुषांचा स्वभावच आहे. आता कबूल करा की, अशी चूक मी पुन्हा करणार नाही. पुरुषी अहंकार सोडून द्या. स्त्री व पुरुष ही समसमान दर्जाची आहेत हे मान्य करा व बायकांना काय कळवायचं आहे हे वाक्य तोंडातून काढून टाका. तुमच्या मित्रमंडळींनाही कळवून टाका. काय समजलं? उठा आता, चला जेवायला.' नारायणरावांनी हसून म्हटले, 'जेवायला उठतो पण मी अपराध कबूल केलाय, आता मी घेणारं प्रायश्चित्त लक्षात आहे ना? कबूल आहे ना?' नारायणरावांची पत्नी म्हणाली, 'न कबूल करून सांगणार कोणाला? मी बाई आहे ना?'

स्त्री वाचकहो, पुरुषी अहंकार, स्त्रीकडे दुय्यम या दृष्टीने पाहाण्याची आजची समाजाची वृत्ती हा समाजाला लागलेला एक भयंकर कर्करोग आहे. रोग असाध्य पण विज्ञान युगात त्याला नक्की औषध सापडेल. 'प्रयत्न करणे मनुजाचे म्हणजेच स्त्री-मुक्ती चळवळीच्या कार्यकर्त्यांचे काम आहे.'

१०. ध्येयवादी-स्वाभिमानी मधुवंती

❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

गोपाळराव गोडबोले या नावाचे एक सुप्रसिद्ध वकील हैद्राबाद या मोठ्या शहरात वकिलीचा व्यवसाय करीत होते. गोपाळरावांचे वडील वकील, आजोबा वकील. तेव्हा असे हे गोडबोले घराणे वकिलांचे घराणे म्हणून ओळखले जात होते. मोठा बंगला, बाजूला मोठी बाग, बागेला माळी, पूजेला ब्राह्मण, घरात दोन गाड्या. असा होता आमच्या गोडबोले वकिलांचा थाट. पत्नी राधिकाही पदवीधर होती. लोकांच्या दृष्टीने गोडबोले घरात एक उणीव होती-ती म्हणजे त्यांच्या घराण्याची वकिली चालवण्यास गोपाळराव गोडबोले वकिलांना मुलगा नव्हता. त्यांना होत्या तीन कन्या. थोरली शशिकला सी. ए. होती. ती सदाशिव सोमणांबरोबर लग्न करून अमेरिकेत होती. तिसरी मुलगी दिपाली हिचा विवाह गोपाळरावांनी औरंगाबाद येथील एका प्राध्यापकाबरोबर लावून दिला, ती सुखी होती. आता राहाता राहिली दुसऱ्या नंबरची मुलगी मधुवंती. मधुवंती फार हुशार होती. घराण्याची वकिली पुढे चालू राहावी म्हणून ती वकील झाली, सनद काढली व वडिलांना त्यांच्या कामात मदत करू लागली. मधुवंतीची वकिली चांगली चालत होती. गोपाळरावांनाही आता तिच्याबद्दल आत्मविश्वास वाटू लागला. त्यामुळे लहान लहान खटले त्यातल्यात्यात बायकांचे खटले ते मधुवंतीकडे सोपवू लागले. सुट्टीनिमित्त कोर्ट बंद होण्याचे दिवस जवळ येऊ लागले. पण त्या आधीच मधुवंतीच्या अमेरिकेतील बहिणीने मधुवंतीला अमेरिकेत येण्यास आमंत्रण दिले होते. कोर्ट बंद झाले व मधुवंती ठरल्याप्रमाणे आपल्या बहिणीकडे अमेरिकेला गेली.

सदाशिवराव सोमण व शशिकलाबाई अमेरिकेतील भारतीय लोकांत फार लोकप्रिय होत्या. दर रविवारी त्यांच्याकडे कोणीना कोणीतरी भेटावयास-जेवावयास येत असे. योगायोग असा की, मधुवंतीला हैद्राबादला परतण्याच्या अगोदरच्या रविवारी डॉ. मोहनराव चितळे नावाचा एक पी. एच. डी. मित्र जेवावयास आला होता. हा डॉक्टर नावाप्रमाणेच मोहक व उत्तम व्यक्तिमत्वाचा होता. शशिकलाबाईंनी मधुवंतीची व मोहनरावांची ओळख करून दिली. मोहनरावही अविवाहित होते. शशिकलाबाईंच्या मनात "हा जोडा जमला तर बरे होईल" असा विचार आला.

त्यांनी युक्तीने खटपट सुरू केली. सदाशिवरावांना हळूच सर्व गोष्टी सांगून मार्केटिंग-करता बाहेर जाण्यास सांगितले. ते बाहेर गेल्यावर मधुवंतीला व मोहनरावांना स्वतंत्रपणे बोलण्याची संधी देण्याच्या दृष्टीने सबब सांगून त्या किचनमध्ये गेल्या.

आता खोलीत राहिली मधुवंती व मोहनराव. थोडावेळ इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या. मोहनरावांना मधुवंतीला पाहिल्यापासूनच तिच्याविषयी आकर्षण उत्पन्न झाले होते व ती आपली सहचारिणी होण्याचा योग यावा असे त्यांना मनातल्या मनात वाटत होते. त्यांनी मधुवंतीला विचारले, 'तुमच्या धाकट्या बहिणीचे लग्न झाले आहे, तर तुम्ही अजून अविवाहित कशा?' मधुवंती हसून म्हणाली, 'हा तुमचा प्रश्न मला अपेक्षितच होता. माझे लग्नासंबंधीचे विचार थोडे विचित्र आहेत व ते कोणत्याही जोडीदाराला पटण्यासारखे नाहीत, म्हणून मी लग्नाचा विचारच करीत नाही. जर कोणी जोडीदार मिळालाच तर मग मी लग्नाचा विचार करीन. पण शक्यता फारच कमी आहे.' हे ऐकून मोहनराव हसले व म्हणाले, 'कळूद्या तरी आम्हाला एका भारतीय मुलीचे लग्नाविषयीचे विचार! मी ऐकण्यास उत्सुक आहे.' मधुवंती म्हणाली, 'तुम्हाला ऐकायचे आहेत तर मी सविस्तर सांगते.'

'या जगात स्त्री म्हणून काहीतरी कार्य करावे अशी माझी इच्छा आहे. आज समाजात स्त्रियांना कितीतरी समस्यांना तोंड द्यावे लागते. अत्याचार, बलात्कार, नवऱ्याकडून मारहाण, सासूकडून छळ, हुंडाबळी असे अनेक खटले कोर्टात येतात. स्त्रियांना मी वकील या नात्याने मदत करण्याचे माझे पहिले ध्येय आहे व माझ्या ध्येयाला माझ्या जोडीदाराने आड येता कामा नये.'

'गोडबोले घराणे हे वकील घराणे म्हणून हैद्राबादला प्रसिद्ध आहे. माझ्या वडिलांना मुलगा नाही म्हणून मी वकील झाले आहे व लग्नानंतर आडनाव न बदलणं हे नवऱ्याकडील माणसांना व खुद्द माझ्या नवऱ्यालाही पसंत पडणार नाही. जर कोणी मला एकापुढे एक अशी दोन आडनावे लावून देणारा जोडीदार मिळेल तर मी लग्नाचा विचार करीन.'

'माझ्या वडिलांना मुलगा नाही तेव्हा कोणत्याही परिस्थितीत मी हैद्राबाद सोडणार नाही. तेव्हा माझ्या नवऱ्याला हैद्राबादला नोकरी धरावी लागेल.'

'महत्त्वाची गोष्ट म्हणजे माझ्या भावी नवऱ्याला माझ्यापासून अपत्य लाभ होणार नाही. शरीर सुखात थोडीही कमतरता नाही. ही अट अतिशय अवघड आहे, पण मला माझ्या ध्येयासाठी ही अट आवश्यक आहे असे वाटते.'

'समाजात असणारा पुरुषी अहंकार, स्त्रियांचा छळ, त्यांना मिळणारे दुय्यम स्थान, 'मी तुझा नवरा आहे' या सगळ्या गोष्टींची हकालपट्टी करण्याकरता मी स्त्री–मुक्ती–चळवळीत भाग घेणार आहे.'

इतके बोलून मधुवंतीने मोहनरावांना विचारले, 'काय डॉक्टरसाहेब, आता सांगा होईल का एखादा मुलगा माझ्याशी विवाह करायला तयार?' मोहनराव म्हणाले, 'अटी फारच चांगल्या आहेत व मला स्वतःला तुमच्या सर्व अटी मान्य आहेत. माझी फक्त एकच अट आहे ती म्हणजे विवाहकार्य मुंबईला झाले पाहिजे. सांगा, द्या इथल्या इथे निर्णय. तुमच्या बहिणीकडेच साखरपुड्याचा मुहूर्त करू.' इतक्यात दारावरची घंटा वाजली आणि सदाशिवराव घरी आले. शशिकलाबाईंनी जेवणाचा मेनू उत्तम केला होता. जेवणे झाली. मोहनरावांना काम असल्यामुळे ते लवकरच घरी जाण्यास निघाले. जाता जाता मधुवंतीने मोहनरावांना, 'मी माझा निर्णय मागाहून कळवीन.' असे सांगितले. मोहनराव निघून गेले. पुढे दोनच दिवसांनी ते मुंबईस जाणार होते. चहापानाची वेळ झाली व शशिकलाबाईंनी व सदाशिवरावांनी मधुवंतीला मोहनरावांच्या बरोबर झालेल्या बैठकीचा तपशील विचारला. त्या दोघांनीच तो व्यूह रचला होता. मधुवंतीने सर्व वृत्तांत जसा घडला होता तसा सांगितला व मोहनरावांनी होकारार्थी दिलेले उत्तरही सांगितले. सदाशिवरावांनी हळूच मधुवंतीला विचारले, 'काय करू का मोहनरावांना फोन व कळवू का वकिलीणबाईंचा होकार?' मधुवंतीने हसून संमती दर्शविली. सदाशिवरावांनी लगेच ही आनंदाची बातमी मोहनरावांना कळवली. मधुवंती थोडे दिवसांनी हैद्राबादला पोहोचली व मोहनराव मुंबईस गेले.

मोहन मधुवंतीची हैद्राबाद-मुंबई अशी पत्रापत्री सुरू झाली. पुढे करारात ठरल्याप्रमाणे मोहन मधुवंतीचा विवाह–समारंभ मुंबईस मोठ्या थाटाने पार पडला. गोडबोले मंडळी हैद्राबादला परत गेली व मोहन मधुवंती मधुचंद्राकरिता बंगलोरला विमानाने गेली. आठ दहा दिवसांनी जोडी हैद्राबादला पोहोचली.

सुट्टी संपून कोर्ट सुरू झाले व मधुवंती कोर्टात गोडबोले-चितळे ह्या आडनावाने काम करू लागली. तिने आपल्या ओळखीने मोहनरावांना एका मोठ्या कंपनीत त्यांच्या शिक्षणाला योग्य अशी मानाची नोकरी मिळवून दिली. मोहनराव कंपनीचा संचालक म्हणून काम करू लागले. सुखाचा संसार सुरू झाला. पण हळूहळू बदलाला सुरवात झाली. मधुवंतीची वकिली फारच चांगली चालू लागली. तिने

जिंकलेल्या खटल्यांची वर्तमानपत्रांत वर्णने येऊ लागली. पैशाची कमाईही वाढू लागली. त्या मानाने मोहनरावांचा पगार कमी होता. घरातील नोकरवर्ग-माळी-पुजारी सर्व मधुवंतीलाच जास्त मानू लागले. मोहनरावांचा पुरुषीअहंकार व तो पुरुष असून त्याला घरात मिळालेले दुय्यम स्थान यांचा परिणाम होऊ लागला. तो रस्त्यातून जाऊ लागला की, लोक त्याला वकिलीणबाईचा नवरा म्हणूनच ओळखू लागले. मित्रमंडळीही त्याला टोमणे मारू लागली. मोहनरावांचा राग अनावर झाला व एका रविवारी त्यांनी हुकूम सोडला, 'उद्यापासून वकिली बंद. माझा पगार वाढला आहे तेव्हा तुला वकिली करण्याचे कारण नाही. मी तुझा नवरा आहे व बायको ह्या नात्याने तुला माझे ऐकावेच लागेल.' त्यावर मधुवंती म्हणाली, 'तुम्ही मला लग्नाआधी काही आश्वासने दिली होतीत, ती विसरत आहांत' त्यावर मोहनराव म्हणाले, 'लग्नाआधी पुरुषाने बायकांना दिलेली वचने पाळण्यासाठी नसतात हे तुझ्यासारख्या वकिलीण बाईला समजू नये हे किती मूर्खपणाचे आहे. माझे म्हणणे तुला ऐकलेच पाहिजे.' त्यावर मधुवंती म्हणाली, 'मी तुमचा कधीही अपमान केला नाही, मी श्रेष्ठ व तुम्ही कनिष्ठ हा भेदभाव केला नाही, तुम्ही मला आवडता, माझे तुमच्यावर प्रेम आहे. तुम्ही सांगाल ती गोष्ट मी ऐकेन पण कोणत्याही परिस्थितीत वकिली सोडणार नाही. स्त्री-मुक्ती कार्य सोडणार नाही.'

दुसरे दिवशी मोहनराव कामावर गेले पण त्यांचे लक्ष कामात लागेना. प्रकृती बरोबर नाही असे सांगून घरी आले. 'माझे तुमच्यावर प्रेम आहे, तुम्ही मला आवडता.' हे मधुवंतीचे शब्द सारखे त्यांच्या डोक्यात घोळत होते. त्यांनी खूप विचार केला व रात्री त्यांनी मधुवंतीला जवळ बोलावले व म्हणाले, 'मधुवंती मी तुझ्या बोलण्यावर खूप विचार केला आहे. मी प्रांजलपणे कबूल करतो की, काल मी तुला असे वाईट शब्द बोलायला नको होते. तुझे म्हणणे मला सर्वस्वी पटले आहे आणि यापुढे आपण दोघे सुखाने संसार करू. माझी चूक मला कबूल आहे. मला क्षमा कर.' त्यावर मधुवंती हसून म्हणाली, 'इश्य, बायकोची कसली क्षमा मागता!' सुखी संसार सुरू झाला. स्त्री-मुक्तीचा विजय असो असेच ती मनातल्या मनात म्हणाली.

११. सुधा सुधाकर यांचा सुखी संसार.

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

❊ सुधीर व सुधा दोघे बहीण भाऊ. दोघांमध्ये
❊ वयाचे अंतर फारच कमी म्हणजे अवघी
दोन वर्षे. सुधा व सुधीर त्यांच्या मित्रांबरोबर खेळू लागली की आई आरडा ओरडा करायची. 'अग ए सुधे, तुला काही कळतय की नाही ? तू मुलगी आहेस, मुलीच्या जातीला हे शोभत नाही. लोक आम्हाला नावे ठेवतील.' सुधाला आईचा राग येई. एकेक घटना अशा होऊ लागल्या की, सुधा जास्त जास्त अस्थिर होऊ लागली. सुधीरला बाहेरून घरी यायला वेळ लागला तरी त्याला तेवढी मोकळीक. सुधाला उशीर झाला की, आईची आरडा ओरड सुरू, 'हे पाहा सुधे, मुलींनी दिवसाउजेडी घरी आले पाहिजे.' कॉलेजमधून आल्यावर सुधीर जर एखादे दिवशी पाटपाणी करावयास लागला की, आई म्हणे, 'अरे सुधीर, तू मुलगा आहेस, ही कामे मुलींची आहेत. सुधा करील ते सर्व.' या सर्व बोलण्याचा सुधाच्या मनावर कुठेतरी कळत नकळत ठसा उमटत होता.

आपण केवळ मुलगी आहोत म्हणून आपणास अनेक क्षेत्रे बंद झाली आहेत. घरात, समाजात आपल्याला स्त्री म्हणून दुय्यम स्थान आहे. ही जाणीव दिवसे दिवस वाढत गेली. तिने मनाशी निर्धार केला की, आयुष्यात या अन्यायाविरुद्ध झगडा करावयाचा. समाजात आज जे स्त्रीला दुय्यम स्थान आहे ते बदलून तिला प्रतिष्ठेचे स्थान मिळवून देणे हेच तिने पुढील आयुष्याचे ध्येय ठरवून काम करण्याचे ठरविले. दुसरा निर्णय म्हणजे तिने स्वत:चा जोडीदार ठरवितेवेळी त्याला तिच्या ध्येयांची कल्पना देण्याचे ठरविले. आयुष्यात जर तो पहिल्याने वचन देऊन नंतर पुरुषी अहंकार चालवू लागला तर मी घटस्फोट घेण्यास मागे पुढे पाहाणार नाही हेही त्याचे निदर्शनास आणून देण्याचे तिने ठरविले. तसेच आपले मातृत्व हेही एकाच अपत्यापुरते मर्यादित राहील मग ती मुलगी असो अथवा मुलगा असो हेही त्यास निक्षून सांगण्याचे तिने मनाशी निश्चित केले. सुधाच्या नशिबाने तिला हवा तसा जोडीदार मिळाला. वाई येथील अण्णासाहेब साठे या थोर कुलातील सुधाकर नावाच्या मुलाशी तिचा विवाह झाला. लग्नापूर्वीच सुधाकरने तिला आपले विचार तुझ्याप्रमाणेच आहेत. मीही अशाच मुलीच्या शोधांत होतों असे सांगितले.

सुधाकर हा पुण्याच्या एका महाविद्यालयात प्राध्यापक होता. त्याच्या ओळखीने सुधालाही एका कंपनीत नोकरी मिळवून दिली. सुधा सुधाकरचा संसार सुरू झाला. पाच सहा महिने झाले आणि घरात तिसरं माणूस येण्याची चाहूल लागली. दोघांनाही खूप आनंद झाला. सुधाच्या मनात एकाच अपत्याची आई व्हावयाचे होते व तसा तिचा निर्धार होता. पण देवाची करणी आणि नारळात पाणी. निसर्गाने सुधाचा निर्धार मोडला व सुधाला जुळे झाले. एक मुलगी व एक मुलगा. सुधा जरा खट्टू झाली. पण सुधाकरने तिची समजूत घातली. 'अग, मुलगा व मुलगी ह्यांत फरक नाही हे तुला जगाला दाखवावयाचे होते ना ? मग देवाने तुला ही आयती संधी दिली आहे असे समज.' सुधाचे समाधान झाले.

मुलांची नावे ठेवली, मुलाचे नाव ठेवले सुरेश व मुलीचे नाव ठेवले सुजाता. मुलाचा व मुलीचा दर्जा सारखा आहे हे मुलांच्या मनावर लहानपणापासूनच बिंबविण्याचे दोघांनी ठरविले.

स्त्री-पुरुषांमधील श्रेष्ठ व कनिष्ठ संस्कार मुलांच्या मनावर नकळत होत असतात. मुले वडिलांना अहो बाबा व आईला ए आई असे संबोधितात. त्यामुळे मुलांच्या मनावर बाबा म्हणजे पुरुष, श्रेष्ठ व आई म्हणजे स्त्री, कनिष्ठ असा संस्कार होतो. त्यांनी दोन्ही मुलांना 'ए पप्पा व ए मम्मी' असेच म्हणण्याचे शिक्षण दिले. दोघेही मिळून घरकाम व बालसंगोपन करीत असत व एकमेकांस मदत करीत असत. सुधाला नोकरीमुळे बरेच वेळा धुणी-भांडी, मुलांच्या आंघोळी वगैरे कामे सुधाकरवर टाकून जावी लागत व तोही ती बिनतक्रार करीत असे. दोन्ही मुलांना हे प्रत्यक्ष दिसत होते व त्यांच्या मनावर त्या गोष्टींचा सुपरिणाम होत होता.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे घरातील कामे सर्वांनी मिळून करावयाची. त्यांत तू मुलगी व तू मुलगा आहेस हा तीन अक्षरी मंत्र सुधाच्या घरात अजिबात वर्ज्य होता. घरकाम हे बायकांचे काम आहे असा सुरेशचा ग्रह होऊ नये म्हणून त्यास सुधाने चहा करणे, स्वयंपाक करणे वगैरे कामे सुजाताबरोबर शिकवली व ही कामे दोघांसही बरोबरीने करावयास लावली. मुलेही आनंदाने कामे करीत असत.

वाचकहो, सुधा-सुधाकर यांच्यासारखे सर्वांचे संसार सुखी व्हावेत हीच आमची इच्छा. मुलगा व मुलगी हा भेद नाहीसा व्हावा व पुरुष व स्त्री समाजाची दोन समसमान चाके आहेत, कोणी श्रेष्ठ व ज्येष्ठ नाही. हे स्त्रीमुक्ती चळवळीचे स्वप्न साकार होण्यास मदत व्हावी हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

१२. आम्ही बायकाही काही वेळा चुकतो.

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

सर्वसाधारणपणे आपण सकाळी वर्तमानपत्र वाचावयास घेतले की, आपल्याला स्त्रियांवरील अत्याचारांची माहिती बरेच वेळा आढळून येते. हुंडाबळी, सासूचा छळ, नवऱ्याने मारहाण केली वगैरे गोष्टी वर्तमानपत्रवाले त्यांचे वर्तमानपत्र खपण्याच्या दृष्टीने भडक भडक मथळे देऊन छापतात. अर्थात त्यांत खोटे असे काही नसते. बरेचवेळा दोष पुरुषांचा असतो. ही जरी गोष्ट खरी असली तरी 'बायकाही काही कमी नसतात.'

मनोहर विश्वनाथ नावाचा एक पदवीधर मुलगा होता. नाव जरी मनोहर होते तरी तो नावाला अपवाद होता. नाव मंदा भांडणाशिवाय नाही दुसरा धंदा, असेच काहीसे होते. मनोहरचे डोळे तिरळे होते, डोक्याला टक्कल होते व रंगाने काळा होता, स्वभावाने मात्र अतिशय गरीब व सालस होता.

आई-वडिलांनी मनोहरच्या लग्नाचा विचार केला. 'माझे डोळे तिरळे असल्यामुळे मी लग्न करणार नाही.' पण आईवडिलांच्या आग्रहामुळे मनोहर लग्नाला तयार झाला. मनोहरचे लग्न प्राथमिक शिक्षकाच्या एका गरीब घराण्यातील मुलीशी ठरले. तिचे नाव मंगला होते. मनोहर व मंगला ह्या दोघांच्या वयांत दहा बारा वर्षांचे अंतर होते. केवळ गरीबीमुळे मंगलाला मनोहरशी, जो दिसावयास घाणेरडा होता, तरी लग्न करणे भाग पडणार होते.

वाचकहो, कितीतरी गरीब मुलींना दहा बारा वर्षे अंतर असलेल्या वरांच्या गळ्यांत माळा घालाव्या लागत आहेत. कितीतरी मुलींना सवतीची दोन दोन मुले असलेल्या बिजवरांशी विवाह करावे लागत आहेत. असो.

मनोहर व मंगलचा विवाह झाला. मनोहर मधुचंद्राची सुखस्वप्ने रंगवीत होता. पण दैवगती काही निराळीच होती. पहिल्याच रात्री मंगलेने मनोहरला सांगितले की, तुमचे 'विरार-चर्चगेट' डोळे मला बिलकूल पसंत नाहीत. माझी मुले तुमचे हे डोळे नक्की उचलतील. तुम्ही डोळ्याच्या डॉक्टरकडे ऑपरेशन करून चकणेपण घालवा आणि मगच मुलांचा विचार करा. पुढे मनोहरने ऑपरेशन करून घेतले. खरोखरच ऑपरेशनमुळे मनोहरचे डोळे बरेच सरळ झाले.

मंगलेला श्रीमंत लोकांबद्दल द्वेष वाटत असे. हे श्रीमंत लोक पैशाच्या जोरावर गरीब सुंदर मुलींचे बळी घेतात. श्रीमंत लोक आपल्या नेभळट मुलासाठी पैशाच्या जोरावर सुंदर मुली मिळवतात ह्याचे शल्य मंगलेला जाचत असे आणि म्हणूनच ती मनोहरला घाल्हून पाडून बोलत असे. त्याला घरातील काम सांगत असे. सकाळी मनोहरलाच चहा करायला लावायची. 'हे स्त्रीमुक्ती चळवळीचे स्त्रीपुरुष समानतेचे युग आहे तेव्हा घरातील कामे स्त्रीपुरुषांनी मिळूनच करायची.' असे ती म्हणे.

मनोहर खरोखरच स्वभावाने गरीब होता. तो चहा करणे, वाण्याकडून सामान आणणे, भाजी आणणे, ही कामे तो इमाने इतबारे करीत असे. कधी कधी तर मंगल मनोहरला धुणेभांडीपण करण्यास लावी. मंगल मनोहरला रूप नाही म्हणून घाल्हून पाडून बोलत असे.

मनोहर महाविद्यालयात एक उत्तम प्राध्यापक म्हणून काम करत असे. विद्यार्थी वर्गात तो लोकप्रिय होता. आपली बायको आपल्याला त्रास देते याबद्दल तो कोणालाही काही सांगत नसे. आपला आपण सहन करीत असे.

एक दिवस मनोहरच्याच कॉलेजमध्ये काम करीत असलेली देवयानी मनोहरला म्हणाली की, तुम्ही असे कोणाच्यात मिसळत का नाही? विद्यार्थ्यांना तर तुम्ही फार आवडता! तेव्हा मनोहर म्हणाला, 'काय सांगू तुम्हाला. मी दिसावयास सुरेख नाही म्हणून माझी बायको मला सारखे घाल्हून पाडून बोलत असते. तिला (माझ्या बायकोला तिच्या सौंदर्याचा फार अभिमान आहे.) माझे दुःख सांगून काही उपयोग आहे का? तुम्ही विचारलेत म्हणून मला घरचे सांगावे लागते.' देवयानीला मनोहरची कीव आली. देवयानी व मनोहर या दोघांनी एक नाटक करायचे ठरविले.

५ ऑगस्ट १९८७ रोजी कॉलेजचा संप होता. त्या दिवशी देवयानी मनोहरच्या घरी गेली. ठरल्याप्रमाणे मनोहर घरी नव्हता. देवयानीने मंगलेला विचारले, 'मनोहरपंत केव्हां येणार?' मंगल म्हणाली, 'ते कोठे गेले आहेत तेच मला ठाऊक नाही.' देवयानी जवळसुद्धा मंगल मनोहरला नावे ठेवीत होती. तेव्हा देवयानी मंगलेला म्हणाली, 'पुरुषाचे रूप पाहावयाचे नाही. त्याचे कर्तृत्त्व पाहावयाचे. मनोहर दिसावयास चांगला नसला तरी तुम्ही त्याचा अव्हेर करू नका. रूप नसणे हा त्या माणसाचा दोष असतो का? शेवटी नशीबापुढे कोणाला जाता येत नाही. आणि आपण स्त्रिया आहोत. आपण भारतीय संस्कृतीच्या नियमानेच वागले पाहिजे.

आपण जर आपल्या नवऱ्याचा अव्हेर केला तर लोक कसे आपल्या नवऱ्याला विचारतील? नवऱ्याने बायकोला व बायकोने नवऱ्याला योग्य तो मान दिलाच पाहिजे.'

देवयानीचे बोलणे मंगलेला पटत होते, तिची चूक तिला कळूल चुकली होती. डोळे रडून रडून लाल झाले होते. तिने देवयानीला सांगितले की, तुम्ही माझ्या डोळ्यांत आज अंजन घातले. एवढ्यात दारावर बेल वाजली. मंगल दार उघडायला गेली तर दारात मनोहर पेढे घेऊन उभा होता. मंगलने मनोहरचे याय धरले. मनोहर म्हणाला, 'आज देवयानीमुळे आपला संसार पुन्हा उभा राहाणार आहे.'

देवयानी मंगलेला म्हणाली, 'आपण बायकासुद्धा काही काही वेळा चुकतो, पण स्वतःची चूक कबूल करणे याला मनाचा मोठेपणा लागतो, मनोधैर्य लागते. तू चूक कबुल केलीस यातच तुझा मोठेपणा आहे.'

समाजातील पति-पत्नी जर आपापल्या चुका कबूल करतील तर समाजातील कितीतरी संसार सुखी झालेले दिसतील.



१३. आदर्श नवरा कसा असावा

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

❊ गोपाळराव गोखले नावाचे एक इनामदार
❊ एका तालुक्याच्या गावी राहात होते. पत्नी राधाबाई, मुलगा माधव, शैला व सुचेता या दोन कन्या असा गोखले परिवार होता. घरची खूप श्रीमंती, पैश्याअडक्याला तोटा नव्हता. गोपाळरावांनी आपल्या दोन्ही मुलींचे विवाह चांगली व योग्य स्थळे पाहून यथासांग करून दिले. राहिला फक्त एक माधव, त्यास श्रीमंतीचा गर्व, त्यामुळे शिक्षण जेमतेम इंग्रजी सातवीपर्यंत झाले होते. मुलगा शिकलेला नव्हता म्हणून गोपाळरावांनी त्याच गावातील एका गरीब घराण्यातील मुलीशी माधवचे लग्न करून दिले. सुनेचे नाव माधवी ठेवले. माधवी नावाप्रमाचेच मधुर भाषी व लाघवी मुलगी होती. लग्नानंतर सहा सात महिन्यांनी राधाबाई कर्क रोगाने निधन पावल्या. बायकोच्या अकाली व अचानक निधनाने खचून जाऊन गोपाळरावही इह लोकीची यात्रा सोडून गेले.

माधवचे माधवराव झाले. सांठवणीचे पाणी माधवरावांच्या उधळेपणाने संपत आले, पण माधवरावांचा खुशालचेंडूपणा होता तसाच होता. पैसेअडके अथवा त्याच्या वागण्याबद्दल माधवीकडून काही रोष प्रगट केला गेल्यास तो वेळप्रसंगी माधवीस घालून पाडून बोलण्यास कमी करीत नसे. घरचा सर्व कारभार गोपाळरावांनी माधवीची हुशारी पाहून त्यांच्या हयातीतच तिला समजाऊन दिला होता व गोपाळरावांच्या पश्चात् माधवी तो सांभाळत होती.

माधवी मॅट्रिक होती. तिने शिक्षिकेची नोकरी धरली व ती बी. ए. बी. एड्. झाली. त्यातच तिला एक मुलगा झाला. तो अतिशय हुशार होता, स्कॉलरशिपवर त्याचे शिक्षण चालू होते. माधवीचे म्हणणे असे होते की, स्त्रीला निसर्गानेच अनेक जबाबदाऱ्या दिल्या आहेत. त्या स्त्रियांना पार पाडाव्याच लागतात. त्याबद्दल तिचे काहीच म्हणणे नव्हते. तिचे म्हणणे एवढेच होते की, पुरुषांनी बायकांना कमी लेखू नये, घालून पाडून बोलून त्यांचा अपमान करू नये. तिला सुख दिले नाही तरी दुःख देऊ नये. माधवीला एक जुनी म्हण आठवली 'सोय जाणिल तो सोयरा व जीव जाणील तो नवरा?'

माधवी ही एक उत्तम शिक्षिका होती. विद्यार्थीवर्गात ती सर्वांची अतिशय आवडती होती. माधवीचा आणखी एक गुण म्हणजे तिला सभांतून उत्तम भाषणे करणे आवडे व तिचे भाषणावर प्रभुत्व होते. माधवी एकदा अशीच विचार करीत बसली होती, तेवढ्यात मालतीबाई नावाची एक दुसरी शिक्षिका तिला भेटावयास आली. तिला माधवी भेटल्याचा अतिशय आनंद झाला. मालतीबाई म्हणाल्या, 'माधवीबाई, माझे तुमच्याकडे एक छोटेसे काम आहे.' माधवी म्हणाली, 'संकोच न करता तुमचे काय काम आहे ते मला सांगा. मला जमण्याजोगे असल्यास मी अवश्य करीन.' मालतीबाई म्हणाल्या, 'माधवीबाई, ह्या शुक्रवारी आपल्या महिला मंडळात माझे 'आदर्श नवरा' या विषयावर भाषण करण्याचे ठरले आहे. तेव्हा मला तुमच्याकडून काही मुद्दे व या विषयावरील थोडेबहुत मार्गदर्शन हवे आहे. मी ते सर्व सुसूत्र करून मग माझे भाषण तयार करीन.' माधवीने त्यांची विनंती आनंदाने मान्य केली व त्यांस काही मुद्दे लिहून घेण्यास सांगितले. मालतीबाईंनी लिहिण्यास सुरवात केली,

'हल्ली बायका शारीरिक, मानसिक, बौद्धिक व आर्थिक दृष्टीने खच्ची होत आहेत, त्यांना घरात व बाहेर अशा दोन्ही ठिकाणी कामाचा ताण पडतो, मनावरही

ताण पडतो व त्यामुळे रक्तदाब वाढण्याचा संभव असतो. तेव्हा आदर्श नवऱ्यांनी भारतीय संस्कृती टिकविण्याच्या दृष्टीने बायकांना फार जपले पाहिजे, सांभाळले पाहिजे. तिच्या पाठीशी सदैव उभे राहून तिला प्रोत्साहन दिले पाहिजे. 'तू फार दमतेस, कष्ट करतेस, जरा आराम कर.' असे प्रेमाने म्हटले पाहिजे. असे म्हटल्यावर बायकांना किती आनंद होतो त्याचे वर्णन करता येत नाही. ती दुप्पट जोमाने काम करू लागते. आदर्श नवऱ्याने हे ओळखून वागावे.


नवऱ्यांनी आपला नवरेपणा सोडून देऊन आपली पत्नी म्हणजे आपली मैत्रीण आहे असे समजावे. स्त्रीला गुलाम बनवू नये. नवराबायको दोघेही हल्ली नोकरी करतात. त्यामुळे 'मी दमलो' असे म्हणता कामा नये. जास्तीत जास्त वेळ आनंदात कसा जाईल, आपले दोघांचे जीवनमान कसे उंचावले जाईल याचा जोडीने विचार करावा. 'दया, क्षमा, शांती तेथे देवाची वस्ती' ही म्हण डोळ्यापुढे ठेवून वागावे. या जगात माणूस म्हणून जगायचे असेल तर दोघांनाही एकमेकांची नितान्त गरज आहे हे आदर्श नवऱ्याने लक्षात ठेवावे.

जेवणात जर मीठ नसेल तर जेवण अळणी लागते. पतिपत्नींनी एकमेकांस जीवनातील मिठाप्रमाणे समजावे. एकमेकांचे आधार समजले पाहिजे. आदर्श पतीने आपली पत्नी म्हणजे आपली शक्ती समजली पाहिजे. पुरुषांनी संयमी राहावे, तसेच बायकांनी संयम सोडू नये. तोल जाऊ देऊ नये. पृथ्वीचा तोल गेल्यास जसा हलकल्लोळ होईल तसाच संसारातही होईल.

आदर्श नवऱ्याने मुलांचे कौतुक करावे, मुलांचा अभ्यास घ्यावा, पत्नीला घालून पाडून बोलू नये. स्त्री आपल्यापेक्षा कष्टाळू, प्रामाणिक, महत्त्वाकांक्षी असेल तर ते मान्य करावे. तिला प्रोत्साहन द्यावे.' इतके सांगून माधवी मालतीबाईंना म्हणाली, 'मला जेवढे वरवर सुचले तेवढे मुद्दे सांगितले. आता तुम्ही ते वाढवून लिहा व न बावरतां भाषण करा. सर्व भगिनीमंडळ खूष होईल. मी मुद्दाम रजा घेऊन तुमचे भाषण ऐकण्यास शुक्रवारी भगिनीमंडळात येईन.' मालतीबाईंनी चहा वगैरे घेऊन व माधवीचे पुन्हा पुन्हा आभार मानून माधवीचा निरोप घेतला.

ठरल्याप्रमाणे मालतीबाईंचे भगिनीमंडळात भाषण झाले. सर्वांना भाषण खूप आवडले. दुसरे दिवशी स्थानिक वृत्तपत्रात भाषण व मालतीबाईंचा फोटो छापून आला. गंमत अशी की, ते वृत्तपत्र माधवरावांना पाहावयास मिळाले. त्यांच्या मित्राने सांगितले की, ते भाषण त्यांच्या पत्नीने, माधवीनेच मालतीबाईंना तयार करून दिले होते.

माधवरावांनी वरील भाषण पुन्हा पुन्हा वाचले, त्यांना दर वेळी आपल्या चुकांचा, माधवीला घालून पाडून बोलण्याचा व तिचा तिरस्कार करण्याचा पुनः प्रत्यय येत राहिला व त्यांना आपल्या केलेल्या कृत्याबद्दल व आचरणाबद्दल पश्चाताप झाला. त्यांनी घरी येऊन सर्वप्रथम माधवीची माफी मागितली. गोखल्यांचा तोल गेलेला व डळमळायला लागलेला संसार पुन्हा मार्गी लागला. पुढे त्यांचा मुलगा डॉक्टर झाला. पुरुष वाचकांनी या गोष्टीवरून 'आदर्श' होण्यासाठी बरेच शिकण्यासारखे आहे.



१४. स्त्रीला आधी स्वातंत्र्य मिळाले पाहिजे.

❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

महाविद्यालयांतील प्राध्यापकांचा व प्राध्यापिकांचा संप चालू होता. लता राणे हिच्या घरी तिच्या कॉलेजमध्ये काम करणाऱ्या दोन प्राध्यापिका अरूणा काणे व शोभना देव कॉलेज बंद आहे म्हणून चहा पिण्याकरिता व गप्पा मारण्याकरिता आल्या होत्या. तेवढ्यात दारावरची बेल वाजली. लतिका लोकरे नावाची त्यांच्याच कॉलेजमध्ये काम करत असलेली प्राध्यापिका रागारागाने घरात आली. लता लतिकेला म्हणाली, 'अग, राम गणेश गडकऱ्यांच्या भाववंधन नाटकातील लतिकेसारखी तणतणतच आली आहेस की,' लतिका म्हणाली, 'तणतणू नको तर काय करूं ? आज मी तुम्हाला अहंकारी पुरुषजाती बद्दल थोडे पुराण ऐकवणार आहे.' 'अग, एवढच नां ? मग सांग तरी. आम्ही ऐकूं.'

लतिका बोलू लागली, 'सर्वसामान्य पुरुषजातीची अशी कल्पना असते की, आम्ही बायका नोकरी करतो ते चैनीसाठी. हे थोडे बहुत असेलही खरे पण सर्व साधारण स्त्रियांना अनेक आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागते आणि म्हणूनच त्यांना नोकरी करावी लागते. धाकट्या भावंडांचे शिक्षण, म्हातारे आईवडील यांना भाऊ नसल्यामुळे आर्थिक मदत करावी लागते. नवरा दारूपायी पैसे उडवितो म्हणून नोकरी करावी लागते. अशी एक ना दोन स्त्रियांना नोकरी करण्यास भाग पाडतात.

स्त्रिया ह्या प्रामाणिकपणे काम करत असतात. पण जरा कुठे तिच्या हातून चूक झाली की, पुरुषी अहंकार तिच्या चुका चारचौघांत बोलून दाखवितो. तू बाई आहेस, बुद्धीने कमी आहेस, चूल आणि मूल हेच तुझे क्षेत्र आणि तेच निसर्गाला धरून आहे. तुम्ही स्त्रिया पुरुषांच्या नोकरीमध्ये एक अडथळा आहे, स्त्रियांमुळे कितीतरी पुरुष बेकार झाले आहेत.'

लतिका रागाने सांगत होती त्यावर अरुणा काणे म्हणाली, 'पुरुषजात म्हणजे पशूंची जात; स्त्रीसुखाला हपापलेली जात. स्त्री म्हणजे एक उपभोग्य वस्तू, या एकाच दृष्टीने पुरुषाने स्त्रीकडे बघायचे का? पुरुषजातीने लक्षात ठेवावे की, स्त्रियांना शरीराप्रमाणे मनही असते, आशा आकांक्षा असतात, आयुष्यात काहीतरी करून दाखवावे असे स्त्रियांनाही वाटते. त्यांना पण पुरुषांप्रमाणे जिद्द असते, ध्येय असते, पण पुरुषांनी त्यांची मने, भावना मारून टाकलेल्या असतात. लते, तुला खरंच सांगते, हे आमच्या पुरुषवर्गाला केव्हा कळणार, ते देव जाणे!' लताने अरुणाला थांबवून चहा आणून ठेवला व म्हणाली, 'तुम्ही दोघींनी सांगितले ते अगदी सत्य आहे. माझ्या कॉलेजमध्ये एक प्राध्यापक आहेत ते म्हणताना मी ऐकले आहे, 'ज्या स्त्री समाजात आम्ही वर्षानुवर्षे सूर्यकिरण सुद्धा जाऊ दिला नाही, ज्या स्त्रीला आम्ही शतकानुशतके गुलामाप्रमाणे वागवले, ती स्त्री आम्हाला शास्त्र शिकवू लागली आहे, आम्ही पुरुष हे कधीही सहन करणार नाही. स्त्रियांनी कितीही स्त्री-मुक्ती चळवळी केल्या तरी त्याचा काहीही उपयोग होणार नाही असे माझे स्पष्ट मत आहे.'

ह्यावर लता आपल्या मैत्रिणींना म्हणाली, 'आजची स्त्रियांची परिस्थिती फार गंभीर आहे व त्यांच्या समस्या अनेक आहेत; म्हणूनच आपण सर्व स्त्रियांनी संघटीत होऊन स्त्री-मुक्तीची चळवळ धडाडीने जोरात चालू ठेवली पाहिजे. स्त्रीला आधी स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, मग स्त्री-मुक्तीला वेळ लागणार नाही. लतिका आणि अरुणा जाता जाता म्हणाल्या, 'एकंदरीत संपाचा आजचा दिवस चांगला गेला.'

१५. लग्नातील हुंडा व मानपान

❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

'तुमची मुलगी विमल आमच्या वसंतासकट सर्वांना पसंत आहे. तरी पुढील बोलणी करण्यासाठी यावे ही विनंती. लग्नाच्या खर्चाचा साधारण अंदाज खालीलप्रमाणे– १५ तोळे सोने, दीड हजार रुपये मानपान व दोन हजार रुपये मुलाच्या पोषाखाकरिता. जेवणाची वरपक्षाकडील दोनशे पाने. संध्याकाळी स्वागतसमारंभासाठी पानसुपारी, पेढे, आईस्क्रीम वगैरे. रुखवताची भांडी वगैरे वधुपक्षाने आपल्या हौसेप्रमाणे द्यावीत. लग्न हौसेने व्हावे ही इच्छा. कळावे, लोभ असावा ही विनंती.

आपला,
विनायक वागळे,

वामनरावांना एका सकाळी पोस्टमनने एक पत्र आणून दिले. वामनरावांनी ते पत्र बायकोला व विमलला दाखविले व पुढे काय करावयाचे याचा विचार सुरू झाला.

विमल म्हणाली, 'दादा, मला लग्नच करायचं नाही. मला सहाशे रुपयांची नोकरी आहे. हुंड्याच्या चालीविरुद्ध चळवळ उभारण्याचं मी ठरवलं आहे. अशी चळवळ सुरू होण्याची अत्यंत जरूरी आहे. वधुपक्षाकडून पैसे उकळण्याची जशी काही चढाओढच लागलेली आहे. लग्न ही बाब एकट्या वधुपक्षाचीच आहे असं समजलं जातं. माझी तुम्हाला अशी विनंती आहे की, आपले दिवंगत पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांचं उदाहरण पुढे ठेवून जो मुलगा माझ्याशी लग्न करायला तयार होईल त्याच्याशीच मी लग्न करणार.'

'लालबहादुर शास्त्री यांच्या लग्नाची बैठक बसली होती. लग्नाची तारीख, जागा वगैरे सगळं ठरलं. नंतर त्यांच्या सासऱ्याने विचारलं, 'आतां हुंड्याची रक्कम सांगावी.'

शास्त्रीजींनी सांगितलं, 'चरखा आणि सुताच्या दोन गुंड्या.'

वराच्या उत्तराने वधुपक्षाकडील सारी मंडळी आश्चर्यचकित झाली. 'हे काय? आणखी काही तरी मागा ना!' अनेकजण त्यांना आग्रह करू लागले. पण शास्त्रीजी म्हणाले, 'मी सांगितलेल्या दोन वस्तू व तुमची लाडकी कन्या याशिवाय

एकही अधिक वस्तू जर तुम्ही मला देणार असाल तर मी इथून ताडतोब निघालो बघा.'

सासरच्या मंडळींना त्यांची मागणी पूर्ण करावी लागली. असे होते आमचे शास्त्रीबुवा!'

ही गोष्ट सांगून विमल वामनरावांना पुन्हा म्हणाली, 'तुम्ही वरपक्षाकडे जा. त्यांना तुम्ही माझी मतं कळवा व तडजोडीने लग्न ठरत असेल तर ठरवा. नाहीतर मी लग्नच करणार नाही!'

वामनराव विनायकरावांकडे गेले. आपल्या मुलीचे सर्व बोलणे वामनरावांनी त्यांना सांगितले. विनायकरावांच्या शेजारी त्यांचा मुलगाही बसलेला होता.

विनायकराव काहीसे गडबडले व ते आपल्या बायकोचा सल्ला विचारायला गेले. तेवढ्यात नवरामुलगा वामनरावांना म्हणाला, 'मी अशा बाणेदार मुलीशीच लग्न करणार. लग्न ही समस्या दोघांचीही आहे हे तुमच्या मुलीचं म्हणणं मला पटलेलं आहे.'

असे म्हणून तोही घरात गेला. तोपर्यंत त्या नवराबायकोचे काय बोलणे झाले होते त्याचा त्याला काहीच अंदाज नव्हता. मग त्या तिघांचे बोलणे होऊन ती सगळी मंडळी बाहेर आली व त्या सर्वांनी वामनरावांना लग्नाचे नक्की झाल्याचे सांगितले.

वामनरावांनी घरी जाऊन ही आनंदाची बातमी सांगितली. वसंताने दाखविलेल्या उदार विचारसरणीचे सर्वांनी कौतुक केले. लग्न उत्तम तऱ्हेने पार पडले.

लग्न पुढीलप्रमाणे झाले. एक रुपया वरदक्षिणा, मानपान दोन्ही पक्षांनी आपापल्या हौशीप्रमाणे केले. लग्नखर्च दोन्ही पक्षांनी समसमान केला.

यापुढे सगळी लग्ने अशीच झाली पाहिजेत असे लग्नाला जमलेली सर्व मंडळी म्हणत होती. सर्वांनी वसंताला धन्यवाद दिले.

वाचकहो, आजच्या तरुण अविवाहित मुलांनी भारताचे माजी पंतप्रधान शास्त्रीजींचा आदर्श पाळावा. वसंताने दाखविलेले धैर्य डोळ्यापुढे ठेवावे. हुंडा घेण्याकरिता आईवडिलांच्या पाठीमागे दडू नये.



१६. स्त्री स्वातंत्र्य हीच खरी स्त्री मुक्ती

❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

विमल आणि कमल या दोघी लहानपणा-
पासूनच जीवश्च कंठश्च मैत्रिणी. दोघीही हुशार, समंजस, उत्तम व्यक्तिमत्त्व असलेल्या. दोघी उच्च पदवीधर झाल्या व निरनिराळ्या दोन महाविद्यालयांत प्राध्यापिका म्हणून काम करू लागल्या.

कमल आणि विमल या दोघींचे स्त्री-स्वातंत्र्याविषयीचे विचार सारखे होते. स्त्री-जीवन म्हणजे दुःखदायी जीवन! स्वातंत्र्यरहित जीवन! सबंध आयुष्यभर पुरुषी अहंकाराचे निरनिराळे चटके खात जगणारे जीवन! असे कमलचे विचार होते. विमललाही ते पटत असे पण करायच काय? असा तिच्या मनात प्रश्न पडे. प्रत्येक रूढी-नियम, पूजा-अर्चा स्त्रियांच्या विरुद्ध, त्यांचा अपमान करणाऱ्या, लग्नसंस्था, लग्नविधी, बायकांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणणारी अशी ही घटना म्हणजे तिच्या गुलामगिरीची, तिला हीन ठरविणारी, तिला दुय्यम ठरविणारी परिसीमा आहे. मुलीला मुलाकडे दाखवावयास नेणे, हुंडा घेणे, आईबापांच्या विकृत अशा सन्मानाच्या मागण्या मान्य करणे याही गोष्टी अगदी तिरस्करणीय व त्याज्य आहेत असे दोघींना वाटे.

आषाढी एकादशीचा दिवस होता. सर्व शिक्षणसंस्था बंद होत्या, पण सर्व कार्यालये चालू होती. कमलचे आता लग्न झाले होते. विमल कमलकडे गेली, व तिने कमलला विचारले, 'तुझ्या घरचं वातावरण कसं आहे? तुझे यजमान कसे आहेत?' त्यावर कमल म्हणाली, 'अग, काय सांगू? आमच्या घरचा पुरुषी अहंकार इतका आहे की, हे स्त्रियांना नेहमी कमीच लेखतात. स्त्रियांना काय कळतयं, दाग-दागिने, कपडे-लत्ते, शानशौकी ह्यासाठी त्यांच्या नोकऱ्या, सासु-सासरे, दीर-नणंदा यांची सेवा करण्यातच त्यांची मोक्षप्राप्ती आहे. काय सांगू? माझा सगळा स्वाभिमान, स्त्री-स्वातंत्र्याविषयीचे विचार ह्यांना ह्या घरात अजिबात थारा नाही बरं! माझं जाऊदे. तू सांग विमल तुझं कॉलेज काय म्हणतयं? कशी काय चालली आहे तूझी प्राध्यापिकेची नोकरी?' त्यावर विमल म्हणाली, अग, तुझी जी घरातली तऱ्हा, तीच माझी बाहेरची. बायकांची एक म्हणच आहे 'घरी तसं दारी अन् सासरी तसं माहेरी' समाजात काय किंवा महाविद्यालयात

काय ! मी स्त्री आहे ही गोष्ट क्षणभर देखील दृष्टिआड होत नाही, सगळीकडे अन्याय. माझी हुशारी, कर्तृत्व कोणाला दिसतच नाही. दिसते काय ? तर फक्त माझे स्त्रीत्व. आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य परवा सेवानिवृत्त झाले. त्यावेळी वाटले होते की, मी सीनिअर आहे तेव्हा मला नक्की प्राचार्यपद मिळेल. पण काय झाले ! मी स्त्री आहे. मला प्राचार्यपदाची जबाबदारी पेलणार नाही असे आमच्या श्रुतिस्मृतिपुराणोक्त संस्था चालकांचे मत पडले. एका ज्युनिअर प्राध्यापकाची प्राचार्य म्हणून नेमणूक झाली. त्याच्या हाताखाली आम्ही चार स्त्रिया प्राध्यापिका म्हणून बिनतक्रार काम करीत आहोत. आम्ही चौघीहीजणी शिक्षण, ज्येष्ठता, श्रेष्ठता, अनुभव या सर्व दृष्टींनी श्रेष्ठ आहोत, पण आम्ही पडलो स्त्रिया !' विमलच्या डोळ्यात पाणी आले. विमलने रडत रडतच कमलचा निरोप घेतला. खरोखर विमलवर फार मोठा अन्याय झाला होता.

वाचकहो, पुरुष वर्गाने हा पुरुषी अहंकार सोडून द्यावा. वास्तविक स्त्री जेवढ्या आत्मीयतेने, चिकाटीने, सोशिकपणाने काम करते तेवढे पुरुषांना जमतेच असे नाही. अशा गोष्टी पाहिल्या म्हणजे स्त्री-मुक्ती चळवळीची अत्यंत जरूरी आहे असे वाटल्यावाचून राहावत नाही. स्त्रियांना स्वातंत्र्य व समानता मिळालीच पाहिजे. स्त्री स्वातंत्र्य, हीच खरी स्त्री मुक्ती.

१७. स्त्री मुक्ती–प्राध्यापकांचे भाषण

मुंबईच्या उपनगरातील एका महिला मडळाच्या अध्यक्षा रजनीताई चितळे होत्या व त्याचा मंडळाच्या सेक्रेटरीपदी शामाबाई महाजन नावाच्या बाई काम करीत होत्या. विषय निघता निघता असा निघाला की, शामाबाईंनी आपले यजमान प्राध्यापक वसंतराव महाजन यांचे त्यांच्या महिला मंडळात 'स्त्री-मुक्ती' या विषयावर व्याख्यानाचा योग आणावा. शामाबाई म्हणाल्या, 'आमचे हे ना ! मुळीच येणार नाहीत.' त्यावर रजनीबाई म्हणाल्या, 'अहो, शामाबाई जरा आर्जव करा. यजमान येत नाहीत कसे ! तुम्हाला ते जमेल. ते काही नाही. कार्यक्रम ठरला असेच आम्ही जमेस धरून तशी

घोषणाही करून टाकतो.' शामाबाईंनी कबूल केले. दिवस ठरला, वेळ ठरली. शामाबाई घरी गेल्या व त्यांनी सर्व प्रकारच्या युक्त्या लढवून वसंतरावांकडून व्याख्यानाचे आमंत्रण घेण्याचे नक्की केले.

व्याख्यानाचा दिवस उगवला. घड्याळात तीन वाजल्याचे ठोके पडले. संजीवनीबाई जोशी झोपेतून जाग्या झाल्या. भराभरा चहा करून प्यायल्या व थोडासा जामानिमा करून व्याख्यानाला महिलामंडळाकडे निघाल्या. वाटेत त्यांना सरोजिनीबाई दाते नावाची मैत्रीण भेटली. दोघीजणी घाईघाईने मंडळात आल्या. हॉल अगदी गच्च भरून गेला होता. संजीवनीबाई व सरोजिनीबाईंनी जेमतेम बसण्याची जागा मिळविली.

अध्यक्ष रजनीबाई, सेक्रेटरी शामाबाई व व्याख्याते प्रा. वसंतराव महाजन टेबलाजवळ ठेवलेल्या तीन खुर्च्यांवर बसले. रजनीबाई उभ्या राहिल्या व म्हणाल्या; आज आपल्याकडे प्राध्यापक वसंतराव महाजन 'स्त्री-मुक्ती' या सध्या गाजलेल्या विषयावर भाषण करण्याकरता आपल्या विनंतीला मान देऊन आले आहेत. तरी मी आपला फार वेळ न घेता त्यांना भाषण करण्याची विनंती करते.

प्रा. महाजन उभे राहिले व त्यांनी भाषणास सुरवात केली. माननीय अध्यक्षाबाई व एक अपवाद सोडून माझ्या भगिनीनो, खरं म्हणजे हा विषय मला जरा नवीनच आहे, पण पत्नीने सक्ती केल्यामुळे मला स्त्री-मुक्ती या विषयावर बोलणे भाग पडत आहे. भारतामध्ये आज बारा तेरा वर्षे स्त्री-मुक्ती चळवळी चालू आहेत. तरी या चळवळींना फारसे उद्दिष्ट गाठता आलेले नाही असे मला वाटते, असे खेदाने म्हणावे लागते. स्त्री-मुक्ती, स्त्री स्वातंत्र्य, स्त्री-पुरुष समानता हे शब्द सगळीकडे ऐकू येऊ लागले आहेत. माझ्या मते काही लेखकांच्या मते ह्या चळवळीला स्त्री मुक्ती हे नावच मुळी चूक आहे. आमच्या लहानपणी आमच्या घरी दोन गीर जातीच्या सुंदर गाई होत्या. दहा वाजण्याच्या सुमारास आमचा गुराखी येत असे. गाईची दावी सोडून त्यांची मुक्तता करीत असे व त्यांना सतत चरावयास नेत असे. दुसरे उदाहरण सांगतो. तुरुंगातील एकाद्या कैद्याची शिक्षेची मुदत संपली म्हणजे जेलर त्यांची तुरुंगातून मुक्तता करतो. मला सांगावयाचे ते हेच की, आम्ही पुरुषांनी स्त्रियांना बांधून ठेवलेच नाही, त्यांना सर्व ठिकाणी जाण्याची मुभा आहे तर त्यांना मुक्त करण्याचा प्रश्नच नाही. तरी या चळवळीला 'स्त्री-स्वातंत्र्य' 'स्त्री-पुरुष समानता' असे नाव दिले असते तर जास्त योग्य झाले असते-शोभून दिसले

असते.' या प्राध्यापकांच्या भाष्यावर श्रोत्यांपैकी वसुंधरा बखले नावाच्या एक स्त्री-मुक्ती चळवळीच्या कार्यकर्त्याबाई उठून उभ्या राहिल्या व अध्यक्षांना म्हणाल्या, 'मला दोन तीन मिनिटे आताच बोलण्याची संधी द्यावी म्हणजे मी प्राध्यापकांचा हा वादाचा मुद्दा खोडून काढते.' अध्यक्षबाईनी प्राध्यापकांची संमती घेऊन वसुंधराबाईंना बोलण्याची परवानगी दिली. वसुंधराबाई टेबलाजवळ जाऊन बोलू लागल्या 'माननीय अध्यक्ष, प्राध्यापक साहेब, व माझ्या भगिनीनो स्त्री-मुक्ती चळवळीच्या या नावाबद्दल बऱ्याच लोकांचा त्यातल्यात्यात नामांकित लेखकांचा विरोध आहे. इतकेच नव्हे तर काही ठिकाणी कुचेष्टा केली जाते. टिंगल केली जाते. मी स्वतः माझ्या कानांनी ऐकले आहे. मला लोकांना एवढेच सांगावयाचे आहे की, पुरुषांनी आम्हा स्त्रियांना बांधून ठेवले नाही. पण आम्हाला खरी चीड आहे ती स्त्रियांवरील अत्याचारांची, त्यांच्यावर होणाऱ्या बलात्काराची, त्यांना मिळत असलेल्या दुय्यम स्थानाची व पुरुषी अहंकाराची. आम्हा बायकाना समानतेची वागणूक हवी आहे, पुरुषांच्या इतकाच मान सन्मान हवा आहे. भाषण लांबत चालले आहे पण बोलल्याशिवाय राहावत नाही. राम गणेश गडकरी यांनी एका नाटकात पुरुषांचे वर्णन केले आहे. 'कठिण कठिण कठिण किती' अगदी योग्य आहे. पुरुष आमच्याबरोबर हसतील, गोड गोड बोलतील, चहा देतील–लंचला बोलावतील, बसचे तिकीट काढतील, इतकेच नव्हे तर मोटारीतून लिफ्ट देतील. पण संत्र्यापासून मंत्र्यांपर्यंत एकच उद्देश! चॉन्स कधी मिळतोय. भगिनीनो, स्त्रीमर्यादा सोडून माझ्या तोंडून शब्द निघून गेले. क्षमस्व. आतापर्यंत सांगितलेल्या गोष्टीतून, त्रासातून आम्हाला मुक्तता हवी आहे. म्हणून आम्ही या चळवळीला स्त्री-मुक्ती हे नाव दिले आहे. माननीय प्राध्यापकांना माझे बोलणे पटेल अशी आशा करते व मला मध्यंतरी बोलण्याची संधी दिल्याबद्दल त्यांचे व अध्यक्षांचे आभार मानून आपली रजा घेते.' बोलणे संपल्यावर प्राध्यापकांसह सर्व श्रोत्यांनी टाळ्यांचा कडकडाट करून वसुंधराबाईंचे अभिनंदन केल्याचे दर्शविले.

त्यानंतर प्राध्यापक वसंतराव पुन्हा बोलण्यास उभे राहिले. ते म्हणाले, 'भगिनींनो, वसुंधराबाईंनी आता आपल्या भाषणात ज्या गोष्टी सांगितल्या, त्या मला तर पटल्याच पण या सर्व गोष्टी स्त्री-मुक्ती या नावाला चूक म्हणणाऱ्या विरोधकांना पटण्यासारख्या आहेत. या बाईंच्या पाच मिनिटांच्या भाषणावरून स्त्रियांच्या अंगच्या गुणांचे व समयसूचकतेचे दर्शन घडून आले. त्यांच्या भाषणावरून

मी एवढेच सांगू इच्छितो की, स्त्रियांच्या समस्या खऱ्या आहेत. त्या सर्व दूर होण्यास चळवळीची गरज आहे. ती तुम्ही स्त्रियांनी चालू ठेवावी व ती यशस्वी होवो अशी इच्छा मी प्रदर्शित करतो. या महिलामंडळात मला या प्रश्नावर बोलण्याची संधी दिल्याबद्दल मंडळाचे व आपण श्रोत्यांनी माझे भाषण शांत चित्ताने ऐकून घेतल्याबद्दल श्रोत्यांचे आभार मानून आपली रजा घेतो. जय हिंद– जय महाराष्ट्र.'

त्यानंतर मंडळाच्या अध्यक्षा रजनीबाई चितळे यांनी प्राध्यापक महाजनांचे त्यांनी मंडळात येऊन सुंदर भाषण केल्याबद्दल व त्यांच्या पत्नी शामाबाई यांनी हा योग आणल्याबद्दल दोघां पतिपत्नीचे आभार मानले व सभा संपल्याचे जाहीर केले व सर्वांनी कॉफी पिऊन जाण्याची विनंती केली.



१८. पक्षपाती सासुबाई

❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

❋ वासुदेवराव पराडकर या नावाचे एक गृहस्थ
❋ महाराष्ट्र राज्यात एक मोठे अधिकारी म्हणून नोकरी करीत होते. सेवेत असतानाच त्यांनी मुंबई उपनगरात एक चार खोल्यांचा ओनरशिपचा ब्लॉक घेऊन ठेवला होता. सेवानिवृत्त झाले व त्याठिकाणी ते राहावास गेले. त्यांच्या दोन कन्या, रेखा व हेमा दोघींचे विवाह झाले होते व त्या मुंबईतील उपनगरातच आनंदाने व सुखासमाधाने संसार करीत होत्या. वासुदेवराव हे शांत वृत्तीचे, समाजकार्य करणारे व अतिशय लोकप्रिय असे गृहस्थ होते. त्यांची पत्नी आनंदीबाई! या बाई म्हणजे जरा अहंकारी वृत्तीच्या होत्या. 'मी बांधीन ते तोरण व मी सांगेन ते धोरण' अशी त्यांची वृत्ती होती. वासुदेवरावांना यशवंत नावाचा एक मुलगा होता. तो हुशार होता. सी. ए. होता. मुंबईत एका मोठ्या कंपनीत नोकरी करीत होता. आनंदीबाईंना सुनमुख पाहाण्याची घाई झाली होती व त्यादृष्टीने घरात बोलाचाली सुरू झाली.

सर्व वधुवरसूचक मंडळांतून यशवंत पराडकरांचे नाव दिसू लागले. वधुपित्यांची पत्रे, फोन-भेटीगांठी सुरू झाल्या. वर सांगितल्याप्रमाणे वासुदेवरावांनी आपल्या स्वभावाला शोभेल, कुणाकडूनही वाईटपणा येणार नाही अशा रीतीने शारदा नावाच्या एका गरीब आईवापांच्या मुलीशी यशवंताचा विवाह अगदी साध्या पद्धतीने करून दिला. त्यांचा मुलगा यशवंत हुंडाविरोधी आंदोलनात एक कार्यकर्ता होता. शारदा नोकरी करणारी मुलगी होती.

वासुदेवरावांच्या घरात नवचैतन्य सुरू झाले. सुनबाई शारदा पदवीधर असून ती अतिशय सालस आज्ञाधारक व गुणी मुलगी होती. वासुदेवराव व यशवंता या दोघांनाही तिच्याबद्दल प्रेम आणि आदर वाटू लागला. राहाता राहिल्या सासुबाई ! त्या मात्र सुनेवर जराशा नाराज होत्या म्हटले तरी चालेल. तिने मागितलेल्या गोष्टीला त्या नकार देत असत, टीका करीत असत, हेटाळणी करीत असत पण तीच गोष्ट यशवंताने मागितली की, त्याचे कौतुक व होकार देत असत. शारदेच्या मते तिचे सासरे समंजस होते. त्यांच्याबद्दल तिला आदर वाटत होता. सासुबाईंच्या पक्षपातीपणाचे एक उदाहरण. रविवारचा दिवस. सगळ्यांची जेवणे वगैरे झाली. यशवंताने हळूच शारदेला सांगितले, 'आज थोडी पत्रे लिहावयाची आहेत. तेव्हा तुमचे जेवणाचे काम आवरले की, आईला सांगून आपल्या खोलीत ये. जेवणे झाली. आवराआवर झाली. शारदा सासूबाईना सांगून पत्रे लिहिण्याकरता निघाली. त्यावर आनंदीबाई ओरडून म्हणाल्या, 'पत्रे लिहायला बायको काय करायचीये, आज तू तांदळाचा डबा काढ, आणि ते तांदूळ निवडून ठेव. यशवंताला म्हणावं बाबांना घेऊन पत्रे लिहिण्याचे काम कर, मी त्याला तसे सांगून येते.' आनंदीबाई यशवंताला तसे सागून आल्या व तांदूळ निवडायला बसल्या.

'आज काही अपरिहार्य कारणामुळे आम्ही दूरदर्शनवर मराठी सिनेमा दाखवू शकत नाही. क्षमस्व' असे निवेदन दूरदर्शनकेंद्राच्या निवेदिकेने केले, म्हणजे दूरदर्शन प्रेक्षकांचे चेहरे व मनःस्थिती जशी होते तशीच स्थिती आमच्या यशवंतरावांची झाली. मॅटिनी शोचा फज्जा उडाला.

दोन तीन आठवडे या गोष्टीला झाले. एका रविवारी यशवंताने या वेळेस नवी योजना आखली होती. जेवणे झाली, आवराआवर झाली. यशवंताने आईला सांगितले, 'मातोश्रीसाहेब, आज मी ऑफिसमधून कामाच्या फायली घरी आणल्या आहेत. तरी शारदेला मी माझ्याबरोबरच कामाला घेऊन जातो.' यावर बाबांनी हळूच

टोमणा मारला, 'काय यशवंता, काय म्हणते तुमची भगवद्गीता?' बाबांनी हसत हसत आपल्या आईवेड्या मुलाला टोमणा मारला होता. त्यावर आनंदीबाई म्हणाल्या, 'मी काय म्हणणार? ऑफिसचे काम आहे, तर तिला गेलेच पाहिजे. जा बाई, शारदे, जा हो, नवऱ्याला चांगली मदत कर. आज माझ्या मनात डाळी निवडावयाच्या होत्या. घेईन मोलकरणीकडून निवडून.' शारदा व यशवंत निघून गेले. बाबा म्हणाले, 'काय सासुबाई, आज तुमच्या डाळीचा डाव फसला. आपणही एक वेळ तरुण होतो ही गोष्ट लक्षात ठेवून वागत जा. शारदा किती गोड मुलगी आहे! सकाळी उठल्यावर आधी देवाला, मला व तुम्हाला नमस्कार करून मगच ती आपले काम सुरू करते." सासुबाई म्हणाल्या, 'बरं बरं, तुम्ही सासरे लोकच सुनांना डोक्यावर बसवून ठेवता.' वाचकहो, दिसलाना पक्षपात? दुसरे उदाहरण.

वास्तविक यशवंताला आपल्या आईचा स्वभाव कळावयास हवा होता. पण तो शारदेला आईच्या तोंडाशी देत असे. आनंदीबाईचे मानसशास्त्र असे होते की, यशवंत जर आईला म्हणाला, 'आई, 'आम्ही दोघे बाहेर सिनेमाला जातो आहोत,' तर आई नाही म्हणत नाहीच पण उलट दुसऱ्या कोणाजवळ कौतुकाने सांगेल 'माझा यशवंताना फार हौशी आहे. बायकोला कशी सुखात ठेवतो.' हेच जर शारदा विचारावयास गेली असती तर तिला यशवंतासारखे 'सिनेमाला जातो' असे म्हणताच आले नसते. 'आम्ही सिनेमाला जाऊ का?' असे विचारले, तर सासुबाईंच्या कपाळावर आठ्या व काहीतरी कुजकी बोलणी बोलून नकार ठरलेला' कशा काय आहेत सासुबाई.

सकाळी निजून उठायच्या वेळेलाही शारदेची अशीच पंचाईत. लवकर उठावं तर नवरोजी नाराज, लवकर न उठावं तर सासुबाईंचा पारा चढतो. शारदेला बिचारीला तारेवरची कसरत करावी लागे. (प्रत्येक सुनेचा अनुभव) कपड्याच्या बाबतीत तीच कथा. शारदा ऑफिसला जाताना यशवंताच्या आदेशावरून दोन वेण्या, स्लीव्हलेस व कधी कधी पंजाबी ड्रेसही करीत होती. यशवंता आईला हे सांगत नव्हता. त्यामुळे शारदेला बोलणी खावी लागत होती. अशा गोष्टींमुळे सासुसुनेमध्ये तेढ उत्पन्न होते. या गोष्टीला सर्वस्वी जबाबदार असतो तो सासुबाईंचा लाडका मुलगा.

आनंदीबाईसारख्या सासवा व यशवंतासारखे आईवेडे तरुण मुलगे या गोष्टी-पासून बरेच शिकतील अशी आशा करूया.

१९. आम्हा बायकांना कमी लेखू नका

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

❊ वाचकहो, सर्वसाधारणपणे बायका प्रामाणिक
❊ असतात. लबाडी, फसवेगिरी सहसा बायका करीत नाहीत. पण 'आम्ही सर्व क्षेत्रांत पुरुषांच्या बरोबरीने त्यांच्या खांद्याला खांदा लावून काम करू शकतो.' ह्या बायकांच्या म्हणण्यास दुजोरा देण्याचे दृष्टीने मी ही गोष्ट लिहित आहे.

माधवराव जोशांनी केवळ चैन करण्याकरिता म्हणून एक दिवस रजा घेतली. घरी आल्यावर बायकोने सासुबाईंचे पत्र दाखविले व त्यांना साठ रुपये तावडतोब मनीऑर्डरने पाठविण्याकरिता पोस्टात पाठविले. पोस्टात मनीऑर्डरच्या खिडकी-जवळ भली मोठी रांग होती. त्या रांगेत आईवर व बायकोवर जळफळत माधवराव उभे राहिले. इतक्यात त्यांच्या पाठीमागे एक सुंदर स्त्री येऊन उभी राहिली. त्या बाईशी काही तरी बोलावे असे माधवरावांना वाटू लागले. पण संधी सापडेना. एवढ्यात त्या बाईच्या मागचा एक मनुष्य रांग सोडून पुढे घुसू लागला. त्या बाईने त्याला हटकले. ही संधी साधून माधवरावांनी त्या इसमाला बाही धरून मागे खेचले. आपण कसे शौर्य दाखविले या भावनेने माधवराव त्या बाईकडे पाहू लागले. मग त्यांचे भाषण सुरू झाले. माधवरावांनी तिला क्यूच्या दोन मजेदार गोष्टी सांगून आपल्या विनोदाने खूष केले. बोलता बोलता माधवरावांच्या ऑफीसमधला वसंत परांजपे ओळखीचा निघाला. नंतर पोस्टातील कारकुनांच्या चेंगटपणावरून गोष्टी निघाल्या. माधवराव म्हणाले, 'गेंडा, कासव, पाणघोडा, अजगर इत्यादी सुस्त प्राणी तयार करण्याच्या आळसावलेल्या स्थितीत असतानाच ब्रह्मदेवाने हे पोस्टातले कारकून तयार केले असावेत.' हे वाक्य आतल्या मनीऑर्डर कारकुनाला ऐकू जाईल अशा तऱ्हेनेच माधवराव बोलले होते. इतक्यात ती बाई एकदम अस्वस्थ होऊन म्हणाली, 'अहो मिस्टर, माझं एक काम करता का? मला अर्जंट कामाला तावडतोब गेलं पाहिजे.' माधवराव म्हणाले, 'हो हो, जरूर करीन.' त्यावर ती बाई म्हणाली, 'तर मग माझी एवढी ४० रुपयांची मनीऑर्डर करा ना. हा घ्या फॉर्म व हे पैसे. असे म्हणून तिने फॉर्म दिला व शंभर रुपयांची नोट पुढे केली. माधवरावांनी नोट घेतली व

आपल्याजवळचे साठ रुपये तिला परत दिले. ती बाई चटकन टॅक्सी करून निघून गेली. बऱ्याच वेळाने माधवराव खिडकीपाशी आले. त्यांना पाहिल्यावर आतल्या कारकुनाने चहा घेतला, कार्बन बदलला, पेन्सिल केली, जितक्या तऱ्हेने माधवरावांचा खोळंबा करता येण्यासारखा होता, ते सर्व केले व नंतर माधवरावांचे फॉर्म व 'ती' शंभर रुपयांची नोट घेतली. कारकुनांच्या ठराविक पद्धतीप्रमाणे ती दोन्ही बाजूंनी निरखून माधवरावांना परत केली. माधवराव म्हणाले, 'काय हो, काय झालं?' कारकून म्हणाला, 'आम्ही गेंडा, पाणघोडा, कासव, अजगर या जातीचे प्राणी असलो तरी ब्रह्मदेवाने आम्हाला खरी व खोटी नोट ओळखण्याची अक्कल दिलेली आहे.' दुसरे पैसे जवळ नसल्यामुळे माधवराव परत फिरू लागले. मघाशी त्यांच्या विनोदावर खूष झालेले लोक आता त्यांच्याकडे पाहून गालातल्या गालात हसू लागले. एका फटाकड्या बाईच्या नादी लागून जोशीबुवांनी आपल्याजवळचे साठ रुपये घालविले. स्वतःलाही नाहीत, आईलाही नाहीत, रजेचा आनंदही नाही. लोकांत हसू मात्र झाले. मनीऑर्डर फॉर्मवरील पत्त्याची जागा कोरीच होती. फॉर्मवर अंजनी देशपांडे असे नाव होते. दुसऱ्या दिवशी ऑफीसमध्ये वसंत परांजपेला अंजनी देशपांडे ओळखीची आहे का विचारले. त्यावर तो म्हणाला, 'नाही बुवा!' बायकांनी सर्व क्षेत्रात आघाडी मारली आहे हे मनातल्या मनात कबूल करीत माधवराव घरी आले. बायकोला सर्व हकीगत सांगितल्यावर तिने त्यांची कानउघाडणी केली.

२०. नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या समस्या

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

सीमा आणि **तनुजा** या दोघी मैत्रिणी आज बरेच दिवसांनी एकमेकीला भेटत होत्या. दोघींनी एकमेकींची विचारपूस केली आणि सीमा व तनुजा यांचा 'नोकरी करणाऱ्या स्त्रीची समस्या' या विषयावर संवाद सुरू झाला.

सीमा : तनुजा, आजकालच्या स्त्रीने नोकरी करणे ही सामान्य बाब झाली आहे असे मला वाटते.

तनुजा : सीमा, तू म्हणतेस ते खरं आहे. पण अशा नोकरी करणाऱ्या बायकांची समस्या किती गंभीर आहे, हे तुला माहीत आहे कां ? ऐक सांगते. मिळवत्या स्त्रीचे तिहेरी शोषण होत आहे. पुरुषांच्या बरोबरीने अर्थार्जन व घरची सर्व कामे तिलाच करावी लागतात. मिळवती स्त्री सुशिक्षित आहे म्हणून बँकेची कामे, पोस्टाची कामे, बाजारहाट, मुलांची शिकवणी ही कामे सुद्धा स्त्रीलाच करावी लागतात. काय सीमाबाई, पटतंय का ?

सीमा : तनुजा, तू म्हणतेस ते अगदी खरं आहे. आमच्या शेजारी नोकरी करणारे जोशी आडनावाचे एक कुटुंब आहे. नोकरीवरून दोघेही एकदम घरी येतात. जोशीबुवा घरी आले की ऐटीत आराम खुर्चीत पडून राहातात. जोशीबाईंना मात्र ओट्यापुढे उभे राहून चहा करावा लागतो. चहा, खाणे झाल्यावर जोशीबुवा कधी कधी बाहेर भटकावयास जातात, तर कधी आरामात खुर्चीवर बसून पेपर वाचतात, रेडिओ ऐकतात किंवा टी. व्ही. पाहात बसतात. जोशीबाई स्वयंपाक करतात व तो करता करताच एकीकडे त्यांना मुलांचा अभ्यास घ्यावा लागतो. काय तनुजा, पाहिलीस का पुरुषी जात. जोशीबुवा मुलांच्या अभ्यासाची सुद्धां जबाबदारी घेण्यास तयार नाहीत.

तनुजा : खरंच सीमा, असं पाहिलं ना, म्हणजे अगदी राग येतो. जोशीबाईंना आपला नवरा त्यांना सहकार्य देत नाही, म्हणून फार वाईट वाटत असेल, रागही येत असेल, पण सांगणार कोणाला ? बाई ना ?

सीमा : अग तनु, सांगायलासुद्धा मला लाज वाटते पण सांगितल्याशिवाय राहावत नाही. नोकरी करणाऱ्या स्त्रियांची एक गंभीर समस्या आहे. जोशीबाईच मला सांगत होत्या. "काय सांगू सीमाबाई, नोकरी, घरकाम, मुलांचे अभ्यास, बाहेची कामे करता करता जीव अगदी एखादे दिवशी मेटाकुटीस येतो. अंगात त्राण राहात नाही. कधी अंथरुणावर पडून झोप घेते असे होऊन जाते. एनर्जी संपलेली असते. पण अशा परिस्थितीत सुद्धा मला अंगात ओढून ताणून बळ आणावे लागते व माझ्या मनाविरुद्ध पतीला साथ द्यावी लागते. पुरुष जातीची अशी एक अहंकारी समजूत असते की, पतीच्या शरीरसुखाची भूक भागविणे हे स्त्रीचे आद्य कर्तव्य आहे.' हे सांगून जोशीबाईंच्या डोळ्यांना पाणी आले.

तनुजा : सीमाबाई, तू जोशीबाईंची कहाणी सांगितलीस, तीच बहुतेक नोकरी-वाल्या स्त्रियांची कहाणी आहे–प्रमाण कमी अधिक. पण ह्या समस्येचा उल्लेख

करण्याचे साहस, धाडस, धैर्य, स्त्रीच्या अंगी नाही आणि म्हणूनच याचा उल्लेख कोठे होताना दिसत नाही.

सीमा : अग तनुजा, मी जेव्हा नोकरीस लागले, तेव्हा माझ्यापुढे एकच प्रश्न उभा होता. नोकरी करावी का नाही ? नोकरी धरली तर मुलांची आबाळ होणार, मुलांच्या शारीरिक, बौद्धिक व भावनिक विकासासाठी लहान वयात आईच्या प्रेमाची असलेली जरूरी व आईचा सहवास, या गोष्टींना माझी मुले अंतरणार. नोकरीतील पैशापेक्षा मुलांच्या दृष्टीने आईचे प्रेम व प्रेमळ संगोपन जास्त महत्त्वाचे आहे असे माझे मन मला सांगत होते. डोक्यात विचारांचे काहूर माजले होते, पण परिस्थितीमुळे नोकरी करणे भाग पडले.

तनुजा : सीमा, तू म्हणतेस ते बरोबर आहे. पण स्त्री अर्थार्जन करते म्हणून स्वतंत्र असते असे मुळीच समजू नको. माझाच अनुभव सांगते. माझ्या इच्छेप्रमाणे मला खर्च करण्याचे स्वातंत्र्य नाही. घरात कोणती वस्तू आणावयाची ती आमचे हे म्हणजे नवरोजी ठरविणार. सोफासेट, कपाट, टी. व्ही., यांना अग्रक्रम. त्याच्या मागून नंबर लागतो तो गॅस, कुकर, मिक्सर वगैरे बायकी वस्तूंचा.

सीमा : तनुजा, मी जाते आता. बराच वेळ झाला, हे पुराण संपणारे नाही. जाता जाता एकच समस्या सांगते. नोकरीवाल्या स्त्रीला घरी जाण्यास नेहमीपेक्षा जरा उशीर झाला की, घरातील सर्वांच्या नाराजीला तोंड द्यावे लागते. नवरोबांच्या मनात संशयाचे वारे भिरभिरू लागते. पुरुष सहकाऱ्यांशी काम करताना होणारा त्रास सर्वश्रुतच आहे. तनुजा, एकंदरीत काय ! आपण बाई आहोत. स्त्री मुक्ती चळवळीतून काय निष्पन्न होते ते पाहात बसूया.

तनुजा : अग, चळवळीचे फळ जरी आपल्याला दिसले नाही तरी पुढील पिढीला ते फळ नक्कीच दिसेल. निदान तशी अपेक्षा तरी करूया.

२१. ताई माईच्या गप्पा

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

❊ मुंबई आकाशवाणी केंद्रावरून 'वनिता मंडळ'
❊ या नावाने सादर होणाऱ्या कार्यक्रमात अलिकडेच ताई व माई या दोघींच्या संवादातून श्रोत्यांना मनोरंजनातून खूपच माहिती व ज्ञान दिले जाते; असे माझे मत आहे. ताई व माईंचे अभिनंदन व धन्यवाद.

लेखकाच्या ओळखीच्या अशाच दोन-ताई माई आहेत. दोघीही पदवीधर असून दोघींचेही यजमान कॉलेजमध्ये प्राध्यापकाची नोकरी करीत आहेत. ताई व माई आपल्या यजमानाना वसंत व अविनाश या एकेरी नावानेच संबोधितात. स्त्री-पुरुष समानतेचे युग आहेना! नमनात फार तेल न घालविता ताई-माईंच्या संवादाकडे वळूया.

ताई : ए माई, तुझा अविनाश किती हुशार आहे! एकदा व्याख्यानात बोलायला लागला की, मजा वाटते. मला त्याचे भाषण फार आवडते.

माई : खरं सांगू ताई! बाईला दुसऱ्या बाईच्या अंगावरचे पातळ व पुरुषाला दुसऱ्या पुरुषाची बायको आवडते, सुंदर दिसते. तुझा मनोहर काय कमी हुशार आहे! बोलायला लागला की अगदी व. पु. काळे, रमेश मंत्री, वि. आ. बुवा यांच्या भाषणाची, कथा कथनाची आठवण येते.

ताई : मनोहरचे काही सांगू नकोस! टिंगल-चेष्टा, विनोद-कोट्या सगळ्या बायकांच्यावर. पुरुष जातीचा तो गुणच आहे. मुंबई आकाशवाणी केंद्रावरून सादर होणाऱ्या 'आंबट गोड' या कौटुंबिक श्रुतिकेतसुद्धा राजाभाऊ सारखी मालुताईंची टिंगल-चेष्टा करीत असतात.

माई : पण आमची मालुताई काही कमी नाही. तीही राजाभाऊंना चिमटे-बोचकारे काढतेच की! खरोखर माझ्या मते या पुरुषजातीला आता आपण चांगलाच धडा शिकविला पाहिजे. आपले आपण संरक्षण केले पाहिजे.

ताई : माई, तू म्हणतेस की बायांनी आपले आपणच संरक्षण केले पाहिजे. पण तू म्हणतेस ती गोष्ट इतकी सोपी नाही. नोकरी करणाऱ्या स्त्रियांची समस्या किती अवघड आहे, भयाण आहे, किती धोक्याची आहे, हे अनुभवाशिवाय कळायचं नाही. तुला एक माधुरी नावाच्या नोकरी करणाऱ्या स्टेनोटाइपिस्टची गोष्ट सांगते.

माई : अग सांग-सांग, माझे कान अगदी आतूर झाले आहेत.

ताई : ऐक, एका सरकारी कार्यालयात बरेच स्त्री-पुरुष नोकरी करीत होते. पण माई, तुला सांगते, सर्व पुरुष सारखे. एकही अपवाद नाही. सारे बायकांची अभिलाषा धरणारे. या ऑफिसमध्ये खटावकर नावाचे एक मोठे अधिकारी होते. त्यांची कॅबिन मोठी, दोन टेलिफोन, तीन शिपाई व दोन स्टेनोटायपिस्ट स्त्रिया. असा होता थाट या खटावकरसाहेबांचा. माधुरी त्यांचीच एक स्टेनोटायपिस्ट. बाई मोठी धोरणी, हुशार होती. खटावकरसाहेब तिला बऱ्याच सवलती देत असत. खटावकरसाहेबांची आपल्यावर वाईट नजर आहे हे तिने ओळखले होते. पण योग्य संधी आल्याशिवाय स्त्री मर्यादा सोडायची नाही असे तिने ठरविले होते.

माई : बरं मग, आली का संधी ?

ताई : आली तर ! साहेब एक दिवस भराभरा ऑफीसमध्ये आले. शिपायाकडून माधुरीबाईंना डिक्टेशन घेण्याकरिता कॅबिनमध्ये बोलावून घेतले. बाई आल्या. साहेबांनी शिपायाकडून कॉफी मागविली. बाईंनी कॉफी नको म्हणून सांगितले. साहेब म्हणाले, 'घ्या हो-घ्या. मला कुणीतरी कॉफी पिण्यास जोडीदार लागतो.' शिपाई कॉफी सांगण्यास गेला. खटावकरसाहेब खुर्चीवरून उठले. त्यांनी बॅग उघडून दोन कागद माधुराबाईंना डिक्टेशन घालण्याकरता बाहेर काढले व त्याच-बरोबर एक सुंदर गुलाबाचे फूल काढून ते बाईंच्या डोक्यात घातले व काय प्रतिसाद मिळतो आहे हे बघण्याच्या दृष्टीने बाईंच्या डोक्यावरून हात फिरविला.

माई : ताई, खरंच. काय पुरुषी धाडस व पुरुषी वृत्ती आहे ! पुढे काय झाले ?

ताई : माधुरीबाई साहेबांना म्हणाल्या, 'मला हे फूल आवडत नाही. तुम्ही ते दुसऱ्या कोणाला तरी द्या.' बाईंनी साहेबांचा डाव ओळखला होता. त्यावर खटावकरसाहेब म्हणाले, 'असूं दे हो ! आमच्या घरच्या बागेतलं ते आहे. तुमच्या डोक्यात ते चागलं दिसेल म्हणून मुद्दाम मी ते आणलं आहे.' तेवढ्यात शिपाई कॉफी घेऊन आला.

माई : मग, पुढे काय झालं ?

ताई : साहेबांनी व बाईंनी कॉफी घेतली. साहेबांनी बाईंना डिक्टेशन घातले व कागद लवकर टाईप करण्यास सांगितले. 'मला कागद घेऊन ते दुसरीकडे द्यावयाचे आहेत.' असे बाईंना साहेबांनी सांगितले.

माई : अग ताई, मला तर यात काहीच वावगे दिसत नाही.

ताई : सर्व मामला पुढेच आहे. माधुरीबाईंनी कागद टाईप करून आणले व साहेबांच्या हातात दिले. साहेब म्हणाले, 'बाई, जरा बसा, कागद तपासून पाहातो म्हणजे चुका असल्यास लगेच दाखवून सुधारता येतील.' बाईंना साहेबांचे बोलणे पटले व त्या खुर्चीवर बसल्या. कागद तपासता तपासता ते बाईंना म्हणाले, 'माधुरीबाई, मला आज एका चांगल्या सिनेमाचे दोन पास मिळाले आहेत. मी बाहेर जाऊन येतो व मग आपण दोघेजण चार वाजताच्या शोला जाऊ. सिनेमा सुटल्यानंतर मी तुम्हाला घरी सोडीन.

माई : मग, माधुरीबाईंनी काय सांगितलं, दिली का संमती ?

ताई : माधुरीबाई म्हणाल्या, 'साहेब, मला माफ करा.' त्यावर साहेब म्हणाले, 'आलेली संधी, गेलेली वेळ पुन्हा येत नाही. मी बाहेर जाऊन येतो तोपर्यंत तयार राहा. तुमचे वार्षिक रेकॉर्ड, प्रमोशन सर्व सवलती माझ्या हातात आहेत हे लक्षात ठेवा. जातो मी.' साहेब निघून गेले. माधुरीबाई आपल्या जागेवर जाऊन बसल्या. डोक्यात विचारांचे काहुर माजले. 'आई खाऊ घालिना, बाप भिक मागू देईना व उपाशी राहावेना अशी त्यांची स्थिती झाली. नवऱ्याचा अपुरा पगार, सासरेबुवांचे आजारीपण, मुलांची शिक्षणे, या सर्व गोष्टी त्यांच्या डोळ्यापुढे आल्या. त्याबरोबरच हा सिनेमा म्हणजे पुढील नाटकाची नांदी आहे. हेही त्यांनी ओळखले.

माई : काय निर्णय घेतला माधुरीबाईंनी ?

ताई : साहेबांनी सांगितलेल्या सर्व प्रलोभनांवर पाणी सोडून माधुरीबाईंनी साहेबांना चिठ्ठी लिहिली.

'खटावकरसाहेबांना न. वि. वि. माझी प्रकृती बरोबर नसल्याने मी आपली परवानगी गृहीत धरून व अव्वल कारकून शिदोरे यांना सांगून घरी जात आहे. क्षमस्व'. ही चिठ्ठी शिदोरे साहेबांच्या हातात देऊन ती साहेबांना देण्यास सांगून, त्यांची परवानगी घेऊन माधुरीबाई घरी गेल्या. दुसऱ्या दिवशी एक महिन्याच्या रजेचा अर्ज नोकराबरोबर खटावकरसाहेबांच्याकडे पाठवून दिला.

माई : ताई, तू म्हणालीस त्याप्रमाणे नोकरी करणाऱ्या स्त्रियांची ही गंभीर जीवघेणी समस्या आहे.

ताई : माधुरीबाईंनी घेतलेला निर्णय सर्व बायकांना घेता येत नाही. पुरुषवर्ग अशी परिस्थिती निर्माण करतो की, स्त्रिया अगतिक होतात व वळी पडणे भाग पडते. याला म्हणतात सक्तीची खुशी 'व्हॉलंटरी कंपलशन.' माई माझ्या मते बायकांनी आता खटावकरसाहेबासारख्या पुरुषांचे कुटील डाव उलथून पाडण्याच्या दृष्टीने पाऊले टाकली पाहिजेत. या अत्याचाराला तोंड फोडले पाहिजे.

माई : ताई, स्त्री-मुक्ती चळवळीचा हाच एक भाग आहे.

ताई : माई, आजच्या स्त्रीला स्वतंत्र अस्तित्त्व, स्वतंत्र व्यक्तिमत्त्व म्हणून मान्यता हवी आहे. स्वतंत्र विचारांचं व स्वतंत्र आचारांचं स्वातंत्र्य हवं आहे. आजच्या स्त्रीची बौद्धिक व मानसिक पातळी सर्वस्वी पुरुषाइतकीच श्रेष्ठ आहे. हे अहंकारी पुरुष वर्गाला दाखविण्याकरताच आजची स्त्री-मुक्तीची चळवळ आहे.

२२. समारोप

❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

❋ भारतातील बंगाल व महाराष्ट्र ही दोन राज्ये
❋ स्त्रीं सुधारणेच्या बाबतीत अधिक दैववान आहेत, असे म्हणावेसे वाटते. राजा राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, महर्षि अण्णासाहेब कर्वे, गोपाळराव आगरकर, महात्मा ज्योतिबा फुले यांच्यासारख्या थोर समाजसुधारकांच्या अविरत प्रयत्नांमुळेच महाराष्ट्रात व बंगालमध्ये गेल्या शंभर वर्षांत स्त्रीशिक्षणाचा पाया घातला गेला. त्यांच्या या प्रयत्नांमुळेच महाराष्ट्रातील विशेषतः शहरी भागातील स्त्रिया समाजात मोकळेपणाने वावरू लागल्या आहेत, बोलू लागल्या आहेत, लेखन करू लागल्या आहेत, मोठमोठ्या सभांतून, आकाशवाणीवरून, दूरदर्शनवरून भाषणे देऊ लागल्या आहेत, इतकेच नव्हे तर शिक्षण क्षेत्रात महाविद्यालयांतून प्राध्यापिका म्हणून काम करू लागल्या आहेत राजकारणही यशस्वीरीत्या करू लागल्या आहेत. इंदिरा गांधी हे याचे ढळढळीत उदाहरण आहे.

अशा परिस्थितीमुळे पुरुषी अहंकाराला तडा गेला आहे. एका मोठ्या लेखकाने असे लिहिले आहे की, 'अलीकडे स्त्री स्वातंत्र्य म्हणून, स्त्री मुक्ती म्हणून एक प्रकारचा कडवट दुराग्रह तथाकथित पुरोगामी म्हणवून घेणाऱ्या व्यक्ती, संस्था व नियतकालिके यांनी चालू केला आहे.'

या अहंकारी पुरुषांचे म्हणणे असे आहे की, समाजातील सर्व कामे व जबाबदाऱ्या स्त्रीला पुरुषांप्रमाणे स्वीकारता येणार नाहीत, सांभाळता येणार नाहीत. जगातील कोणत्याही देशात स्त्री व पुरुष ही समान केंद्रे मानण्यात येत नाहीत. काही देशांत स्त्रिया पंतप्रधान झाल्या असतील पण स्त्रियांना तेथेही पुरुषांप्रमाणे समान मानले जात नाही. अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रातही अजून स्त्री राष्ट्राध्यक्ष झालेली नाही.

या वरील लेखनावर स्त्री-मुक्ती चळवळीच्या कार्यकर्त्यांचे म्हणणे असे की, अमेरिकेत अजून कोणतीही स्त्री राष्ट्राध्यक्ष झाली नाही हे खरे आहे. अमेरिकेसारख्या देशात स्त्री एक विक्रीची वस्तू म्हणून उपयोग केला जातो. जगातील बहुतेक सर्व देशांत स्त्रियांवर अत्याचार होत आहेत; त्यांच्यावर अन्याय होत आहेत, त्यांना दुय्यम समजले जात आहे, इतकेच नव्हे तर त्यांच्यावर बलात्कारही होत आहेत. स्त्रीमुक्ती चळवळीचे हेच ध्येय आहे की, वरील सर्व गोष्टी कायद्याने बंद झाल्या पाहिजेत. स्त्रियांवर अत्याचार करणाऱ्यांविरुद्ध, बलात्कार करणाऱ्यांविरुद्ध सर्व अरब देशांत त्या गुन्हेगाराला सार्वजनिक ठिकाणी बांधून ठेवून त्याला दगड मारून ठेचून ठार मारले जाते. त्याच धर्तीवर भारतात जर कडक कायदे व त्यांची अंमलबजाणी झाली तर स्त्रियांवरील अत्याचार, बलात्कार, हुंडाबळी वगैरे गुन्हेगारीस आळा बसेल. स्त्री-मुक्ती चळवळ करणाऱ्या कार्यकर्त्यांनी ह्या दृष्टीने, माननीय पंतप्रधान राजीव गांधी व त्यांच्या पत्नी सोनिया गांधी यांच्याशी संपर्क साधावा अशी माझी नम्र विनंती आहे.

स्त्री-मुक्ती चळवळीची एवढीच मागणी आहे की, स्त्रीला पुरुषांनी अहंकार सोडून देऊन सहचरी म्हणून वागवावे. तिला समानता द्यावी, स्वातंत्र्य द्यावे. सत्ताधारी अहंकारी पुरुषवर्गाचे म्हणणे असे की, स्त्रियांनी स्वातंत्र्यासाठी कितीही चळवळी केल्या, मोर्चे काढले, आंदोलने केली, तरी आजच्या समाज व्यवस्थेत काहीही फरक पडणार नाही.

मला स्वत:ला, या पुरुषी वर्गाला, एकच उत्तर द्यावेसे वाटते की, या विज्ञान युगात अशक्य असे काही नाही. सन १८५७ मध्ये ब्रिटिश लोक भारतातून निघून जातील व भारत स्वतंत्र होईल ही गोष्ट अशक्य वाटत होतीच ना ? पण तीच गोष्ट १५ ऑगस्ट १९४७ रोजी शक्य झालेली दिसली. भारत स्वतंत्र झाला. त्याच प्रमाणे १५ ऑगस्ट २०४७ रोजी स्त्रीजातीला संपूर्ण स्वातंत्र्य मिळेल, समानता मिळेल, तिच्यावरील सर्व अन्याय दूर झालेले दिसतील व पुरुषी अहंकारी वर्गाला अशक्य वाटणारी गोष्ट शक्य झालेली दिसेल. स्त्री सर्व दु:खातून मुक्त होईल.

भगिनींनो, 'स्त्री-स्वातंत्र्य हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे व तो आम्ही मिळवणारच' हा घोषमंत्र डोळ्यापुढे ठेवून चळवळ चालू ठेवा, यश तुमचेच आहे. तुम्हाला नक्की स्वातंत्र्य प्राप्ती होईल. श्रीभवानी चंडिका देवी तुमच्या पाठीशी समर्थपणे उभी आहे असे समजा. जय हिंद, जय महाराष्ट्र.





REFBK-0025529

स्त्रियांसाठी काही सुविचार

❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

आई-वडिलांच्या वागण्याचा परिणाम त्यांच्या मुलांवर होत असतो. त्यांनी आपले आचरण, आचार, विचार, सवयी यांचा चांगला आदर्श आपल्या मुलांच्या समोर ठेवला पाहिजे. त्यामुळे भावी पिढी चांगली निर्माण करण्यास ते कारणीभूत होतील.

या जगात स्त्रियांना आपल्या पतीचे इतके महत्त्व असते की, तेवढे महत्त्व स्वतःचा बाप, मुलगा, स्वतः आपण, आई, बहिण यांपैकी कोणाचेही नसते.

ज्ञान देणाऱ्या शिक्षकाने झाडूवाल्यास तुच्छ लेखू नये. रंगसम्राटाने गवयास कमी मानू नये. उत्तमोत्तम घडे बनविणाऱ्या कुंभाराने विणकरास हीन समजू नये. सर्वांनी एकमेकांस पति-पत्नी प्रमाणे समान मानून एकमेकांस प्रणाम करावा. एकमेकांचा आदर-सन्मान करावा.

स्त्री हा शब्दच असा आहे की तो हृदयात जपावा. स्त्रीचा आदर करावा. परस्त्री परमेश्वरासमान मानावी.

घरात जर प्रेमळ माता नसेल किंवा पतिव्रता पत्नी नसेल, निर्मळ मनाची बहीण नसेल तर त्या घराला घर म्हणणेच अशक्य होईल.

आचरण–व्यवहार–विचार असा ठेवावा की, प्रत्येकाने त्याचे गुणवर्णन करावे. प्रत्येकाला त्यामुळे आनंदच नव्हे तर अभिमान वाटावा.

डोंगरावर चढू लागलेली मुंगी चढत राहिली तर डोंगराच्या शिखरावर दीर्घकालानंतर जाऊन पोचते तसे एखादे ध्येय गाठायचे असेल तर चिकाटीने ते मधेच सोडले नाही तर नक्की साधता येईल असा ठाम विश्वास ठेवावा.

मातृत्व हे स्त्रीला मिळालेले असे वरदान आहे की, त्या सुखाचा आनंद पुरुषाला कधीही अनुभवता येत नाही.

स्त्री ही लीनता, लज्जा, मार्दवता आणि प्रेम यांनी परिपूर्णता असेल तरच 'गृहलक्ष्मी' ठरू शकते.

चारित्र्यवान पुरुष ताठ मानेने फिरतो, परंतु मान खाली घालून फिरणे यातच स्त्रीचे चारित्र्य असते.

स्त्री ही पुरुषाची शक्ती आहे.

अग्नीने सोन्याची परीक्षा होते, सोन्याने स्त्रीची परीक्षा होते आणि स्त्रीवरून पुरुषाची परीक्षा होते.

पुरुषाचा मोह आणि संयम स्त्रीमुळे टिकू शकतो किंवा स्त्रीमुळेच ढासळूही शकतो.

पैठ्ठ पाडल्यावर जसा हिरा चमकू लागतो तशी स्त्री–मुलगी–पत्नी–आई–सासू–आजी असे सर्व पैठ्ठ पाडून झाल्यावरच लखलखू शकते.

द्रव्य लोभ, सत्तेचा हव्यास, ज्ञानाची मिजास या सर्वांपेक्षा स्त्रीआसक्ती ही सर्वांत वाईट होय.

घरातील वातावरण, शांत, प्रसन्न व शुद्ध असेल तर त्या घरातील स्त्री याच विशेषांनी युक्त असेल याची खात्री बाळगण्यास हरकत नाही.

संकटकाळी मित्राची परीक्षा होते, रणांगणावर शूराची परीक्षा होते आणि नवरा गरीब असला म्हणजे पत्नीची परीक्षा होते.

उधारीने खरेदी करणाऱ्यास चोख भाव आणि चांगला माल सहसा मिळत नाही.


सामर्थ्य हे पुरुषाचे सौंदर्य असून सौंदर्य हे स्त्रियांचे सामर्थ्य आहे.

जीवन सुखी करण्यासाठी ध्यानात ठेवा—

❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

अगदी क्षुल्लक वस्तू सुद्धा उसनी आणू नका.
एका पैशाची सुद्धा उधारी ठेवू नका.
विनय आणि नम्रता कधीही सोडू नका.
आत्मस्तुती आणि दुसऱ्याची निंदा कधीही करू नका.
शब्द शस्त्र नव्हे तर अस्त्र आहे. जपून वापरा.
मुले आणि वृद्ध परमेश्वर समजून त्यांची सेवा करा.
आपल्या गरजा कमीत कमी करण्याचा प्रयत्न करा.
असेल त्या परिस्थितीत समाधान माना.
आवडीचे काम करण्यापेक्षा मिळालेले काम आवडीने करा.
गरिबीने लाजू नका. श्रीमंतीने माजू नका.
सत्य बोलावे. सत्य अप्रिय असेल तर टाळावे.
परनिंदेसारखे दुसरे घोर पाप नाही.
आपले ते खरे यापेक्षा खरे ते आपले, हे बरे.
काळजी 'घेतली' म्हणजे काळजी 'करावी' लागत नाही.
तोंडातून चुकूनही अपशब्द जाणार नाही याची काळजी घ्या.
मनावर विजय मिळविलात तर जगावर सार्वभौमत्व मिळेल.
अपेक्षा इतकीच ठेवा की अपेक्षा भंग होणार नाही.
आपल्या फायद्यासाठी दुसऱ्याचे नुकसान करू नका.
असंतुष्टता आणि निराशा यांना कधीही जवळ बाळगू नका.
संयम म्हणजे शरणता नव्हे, ते मोठे सामर्थ्य आहे.
प्राप्तीच्या आनंदापेक्षा त्यागाचा आनंद मोठा असतो.
अभिलाशा–हाव–लोभ यांतून दुःख निर्माण होते.
सत्य–अहिंसा–त्याग–यांतून आनंद प्राप्त होतो.
चालताना–बोलताना–खाताना कोठे व कधी थांबावे हे समजून घ्या.
समाधान आणि आनंद यांना कधीही सोडून देऊ नका.
नवऱ्याला खुशीत ठेवा म्हणजे तो मुठीत राहीलच.

समाप्त



व्हे० डॉ० ग० शि० पाटणकर

वाई क्षेत्री जन्म इ. स. १९०५. इंग्रजी शिक्षण द्रवीड हॉयस्कूल वाई. घरची परिस्थिती बेताची. मुंबई सरकारची शिष्यवृत्ती मिळवून व्हेटर्नरी शिक्षण घेऊन (व्हे. डॉक्टर झालो.) मुंबई सरकारची ३५ वर्षे व्हे० डॉक्टर म्हणून निष्कलंक नोकरी केली. याच मुदतीत एकाच वेळी तीन प्रपंच केले. म्हणजे संगीतसाधना, कीर्तनकला आणि समाजकार्य. सामान्य लोकांना संगीताविषयी सुलभ मार्गदर्शन व्हावे म्हणून नोटेशन व आलाप-तालासहित हार्मोनियम मार्गदर्शकाच्या धर्तीवर चार पुस्तके प्रसिद्ध केली. पशुसंवर्धन, शेती, कीर्तन आणि बालवाङ्मय अशा विविध प्रकारचे लेखन करून २२ पुस्तके प्रसिद्ध केली. वयाच्या ८० व्या वर्षी "जरा वळून मागे" हे आत्मवृत्त वाईकर संमेलनात ब्राह्मण सभा, मुंबई येथे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या हस्ते १५ ऑगस्ट १९८४ रोजी प्रकाशीत झाले.